https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -३४ | शुक्रवार, दि.१० ऑक्टोबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-34 | Friday, Dt.10 October 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# ‘ओबीसीं’चा मुंबईत ठिय्या!

## मराठा आरक्षण पुन्हा वादात मराठा विरुध्द कुणबी संघर्ष पेटणार

मुंबई : राज्यातील मराठा आरक्षणाच्या मुद्यावर आता ओबीसी समाजानेही आक्रमक भूमिका घेतली आहे. येथील आझाद मैदानावर गुरूवार दि. ९ ऑक्टोबरपासून कुणबी समाजाने ‘ओबीसी एल्गार’ मोर्चाचे आयोजन केले असून यावेळी अनेक ओबीसी बांधवांनी एकत्र येऊन ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावर मोठे शक्तिप्रदर्शन केले. दरम्यान कुणबी समाज सर्व तयारीनिशी दाखल झाले असून आरक्षणासाठी मुंबईत ठिय्या मांडला आहे.

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सात जिल्ह्यांमधील कुणबी समाजाचे हजारो बांधव आज सकाळपासून आझाद मैदानात जमले आहेत. ओबीसी आरक्षण अबाधित ठेवा, मराठ्यांना ओबीसीमध्ये समाविष्ट करू नका, अशा घोषणा देत आंदोलनकर्त्यांनी मैदान दणाणून सोडले. हे आंदोलन कुणबी समाजोन्नती संघाचे अध्यक्ष अनिल नवगणे आणि उपाध्यक्ष शंकरराव म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.

आंदोलनाच्या माध्यमातून सरकारला हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे दिलेला शासन निर्णय अन्यायकारक असल्याचे म्हटले आहे. आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, सरकारने जर हा निर्णय मागे घेतला नाही, तर राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल. कुणबी समाजाने आपल्या आंदोलनात एकूण नऊ प्रमुख मागण्या मांडल्या आहेत.



### राज्यात पुन्हा तणाव

राज्यातील आरक्षण राजकारणात पुन्हा एकदा तणाव निर्माण झाला आहे. एका बाजूला मराठा समाज आरक्षणासाठी दीर्घ लढा देत आहे, तर दुस-या बाजूला ओबीसी समाज आपल्या अस्तित्वाचा आणि आरक्षणातील वाट्याचा प्रश्न उचलत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. कारण, मराठा समाजालाही न्याय द्यायचा आणि ओबीसींच्या हक्कांवर गदा येऊ नये, ही दोन्ही समांतर जबाबदा-या सध्या राज्य सरकारच्या खांद्यावर आहेत.

हैदराबाद गॅझेटियरचा वाद

मराठा समाजाला कुणबी म्हणून ओबीसी आरक्षण मिळावे, यासाठी सरकारने हैदराबाद गॅझेटियरचा आधार घेतला होता. या निर्णयाविरोधात कुणबी सेना, महाराष्ट्र माळी समाज महासंघ, अहिर सुवर्णकार समाज संस्था, महाराष्ट्र नाभिक महामंडळ आणि सदानंद मंडलिक यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकांमध्ये २ सप्टेंबरच्या शासन निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी

(उर्वरीत पान २ वर)


# कपिलधारवाडीत भीतीचे वातावरण कायम

## भूगर्भ सर्वेक्षण पथकाची पाहणी, तातडीने पुनर्वसनाचे निर्देश

बीड /प्रतिनिधी

पाली अंतर्गत कपिलधारवाडी येथे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या व अतिवृष्टीमुळे जमिनीचा पृष्ठभाग खचला असून, अनेक घरांच्या भिंतींना तडे गेले आहेत तसेच रस्त्यांवर खोल भेगा पडल्या आहेत. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या भूस्खलनग्रस्त क्षेत्राचा आढावा घेण्यासाठी भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागाचे संचालक मेगो चासी आणि वरिष्ठ भूवैज्ञानिक संदीपकुमार शर्मा यांनी बुधवारी स्थळाची पाहणी केली. त्यांनी प्राथमिक निरीक्षण अहवाल सादर करत नमूद केले की, संबंधित भागात पाण्याचा नैसर्गिक निचरा न झाल्याने भूपृष्ठाखाली पाणी साचले आहे आणि त्यामुळे भूस्खलनाची प्रक्रिया



अद्याप सुरू आहे. काही कुटुंबांवर तत्काळ धोका असल्याने त्यांचे तात्पुरते पुनर्वसन आवश्यक असल्याचे त्यांनी सुचविले.


या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी प्रशासनास प्रतिबंधात्मक आणि पुनर्वसनात्मक उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अधिकारी बैठक घेऊन परिस्थितीचा सखोल आढावा घेण्यात आला.

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने स्थलांतरित कुटुंबांसाठी मन्मथस्वामी देवस्थान परिसरात तात्पुरती निवारा व अन्नाची व्यवस्था केली आहे. महिलांना साड्या व आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले असून, मदतकार्य व पाहणीसाठी अधिकाऱ्यांची सतत उपस्थिती आहे.प्रशासनाने नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन करत सांगितले की, परिस्थिती नियंत्रणात असून प्रत्येक कुटुंबाच्या सुरक्षिततेची जबाबदारी प्रशासनाने घेतली आहे.

## राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या उपस्थितीत होणार शिवाजीराव पंडित यांचा अभिष्टचिंतन सोहळा

# बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे अभिष्टचिंतन सोहळा आयोजन समितीचे आवाहन

गेवराई (प्रतिनिधी) गेवराई तालुक्याचे भाग्यविधाते माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार , दि.१० ऑक्टोबर रोजी सकाळी १० वा. शिवनगरी, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे भव्य अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ (नाना) बागडे, श्री क्षेत्र नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. शिवाजी महाराज, श्रीक्षेत्र चाकरवाडी संस्थानचे महंत ह.भ.प. महादेव महाराज, राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष ना. राजन पाटील यांच्या शुभहस्ते



शिवाजीराव पंडित यांचा यावेळी सत्कार करण्यात येणार आहे. त्यानंतर काल्याचे कीर्तन आणि महाप्रसादाने कीर्तन महोत्सवाचा समारोप होणार असून यावेळी हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अभिष्टचिंतन सोहळा समितीने केले आहे.

गेवराई तालुक्याचे भाग्यविधाते आणि बीड जिल्ह्याच्या राजकारणातील भिष्माचार्य म्हणून ओळख असलेले ज्येष्ठ नेते शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार, दि.३ ऑक्टोबर पासून गेवराई शहरात श्रीमद् भागवत कथा आणि भव्य किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले

(उर्वरीत पान २ वर)

## # बॉटम न्युज

### दिव्यांगाना सोयी, सुविधा पुरविण्यासाठी जिल्हा परिषदेत आज बैठकीचे आयोजन

बीड (प्रतिनिधी):दिव्यांग कल्याण विभागाच्या वतीने दिव्यांगाच्या सोयी-सुविधांसाठी सुगम्य करावयाच्या बाबींच्या आढावा घेऊन सदरील माहिती सादर करण्याच्या सूचना दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिवांनी दिल्या आहेत. त्याअनुषंगाने बीड जिल्हा परिषदेच्या विभागप्रमुखांच्या बैठकीचे दिनांक १० ऑक्टोबर रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजन करण्यात आले आहे.

दिव्यांग कल्याण विभाग, सचिवांनी दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोजी बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार माहिती सादर करण्याच्या सूचना दिल्या आहे. कार्यालय प्रमुखांच्या अधिनस्त सार्वजनिक ठिकाणे, माहिती आणि संवाद तंत्रज्ञान, संकेतस्थळे, वाहतूक, वाहन तळ जागा व इतर अनुषंगीक सोयी-सुविधा दिव्यांगांना सुगम्य करण्याच्या अनुषंगाने संदभीय पत्राद्वारे व स्मरणपत्राद्वारे माहिती सादर करण्यात येणार आहे बाबत आपणास कळविण्यात आले होते. . बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार दि.१० ऑक्टेंबर रोजी सकाळी १०.०० वाजता बीड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांच्या अध्यक्षस्थानी सदर बैठक होणार आहे.

## श्री.तुळजाभवानी यात्रेनिमित्त निमित्त भोपा येथे रंगला कुस्त्यांचा फड

दिंद्रुड : नवरात्र उत्सवानंतर कोजागिरी पोर्णिमेच्या निमित्ताने धारूर तालुक्यातील भोपा येथे श्री तुळजाभवानी भव्य दोन दिवसीय यात्रेचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने अनादी काळापासून करण्यात येते. धारूर-माजलगाव तालुक्यातील जागृत देवस्थान म्हणून भोपा येथील तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी हजारोंच्या संख्येने भाविक भक्त भोपा येथे दाखल होतात. यात्रेचा निमित्ताने सोमवारी बैलगाड्या ओढण्याचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला.मंगळवार दि.७ रोजी कुस्त्यांची दंगलीचे आयोजन करण्यात आलेहोते. मराठवाड्यातील मल्ल या कुस्तीच्या दंगलीत सहभागी झाले होते. नांदेड, जालना, बीड, धाराशिव,परभणी आदी जिल्ह्यातून मल्ल मंगळवारी सकाळी भोपा येथे दाखल झाले.



धारूर तालुक्यातील बालाघाट डोंगराच्या परिसरात अनेक पैलवान घडत असल्याचे चित्र आहे. गेल्या काही वर्षांपासून नव तरुणांमध्ये कुस्तीची क्रेझ वाढत आहे. धारूर तालुक्यातील हिंगणी, देवदहिफळ, कासारी, कोयाळ, तेलगाव ,चाटगाव, जवळा, जिवाचीवाडी,भोपा या गावातील मल्ल राज्य पातळीवर कुस्तीचा खेळ खेळत आहेत. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रतिवर्षी कोजागिरी पौर्णिमेच्या

(उर्वरीत पान २ वर)




# श्री शिवानंद आश्रम तमलूर-मदनूर ते श्रीक्षेत्र कपिलाधार २४ वी पायी पदयात्रा

**भक्तिमय वातावरणात २५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबरपर्यंतचा अध्यात्मिक सोहळा**

बीड /प्रतिनिधी

त्रिकाल वंदनीय परमपूज्य गुरुवर्य श्री. ष.ब्र.१०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर यांच्या कृपा, आशीर्वाद आणि मार्गदर्शनाखाली श्री शिवानंद आश्रम, तमलूर-मदनूर ते श्रीक्षेत्र कपिलाधार या २४ व्या पायी पदयात्रेचे आयोजन यंदा भक्तिमय वातावरणात करण्यात आले आहे.



ही पवित्र यात्रा शनिवार, दि. २५ ऑक्टोबर २०२५ रोजी शिवानंद आश्रम, तमलूर येथून प्रारंभ होऊन बुधवार, दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी श्रीक्षेत्र कपिलाधार येथे कार्तिक शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी संपन्न होणार आहे.

गुरुवर्यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या २३ वर्षांपासून पारंपरिक पद्धतीने होणारी ही पदयात्रा भाविकांसाठी आध्यात्मिक साधना, भक्तिभाव आणि आत्मशुद्धीचा महोत्सव ठरली आहे. या यात्रेचा उद्देश साधकांना सांसारिक चिंतामुक्त करून आत्मविकास आणि परमात्मप्राप्तीचा अनुभव देणे हा आहे.

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# बिहारची कसोटी

'सगळ्यात मागे, पण राजकारणात पुढे' अशी ज्याची देशात ओळख आहे, त्या बिहारची विधानसभा निवडणूक अखेर सोमवारी घोषित झाली. एकेकाळी 'दक्षिण आशियातला सर्वात मागास भाग' म्हणून ज्याची ख्याती होती, तो बिहार गेल्या काही वर्षांत बदलला; आधुनिकतेच्या, प्रगतीच्या खुणा मिरवू लागला. ही आधुनिकता खरी, की वरवरची? भौतिक मानकांप्रमाणे बिहारची मानसिकता बदलली का? असेल, तर किती? 'मंडल'पासून त्याने पुढे किती मजल मारली? ते ही निवडणूक दाखवून देईल. कारण या निवडणुकीत बिहारमध्ये २५ टक्के मतदान अत्याधुनिक तरुण पिढीचं आहे. एकूण ७ कोटी ४३ लाख मतदारांमध्ये ज्यांना 'जेन - झी' ही नवी संज्ञा मिळाली आहे, अशा १८ ते २८ या वयोगटातील मतदारांची एकूण संख्या १ कोटी ७७ लाख, म्हणजे २३.८ टक्के आहे. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत बिहारमध्ये सर्वाधिक मतं राष्ट्रीय जनता दलाला मिळाली होती. २२ टक्के. त्यापेक्षा या मतदारांचा मतदानातील एकूण टक्का मोठा आहे! या मतदाराला ओळखणं राजकीय पक्षांपुढे मोठं आव्हान ठरतं आहे. जातीय समीकरणं, विविध सरकारी योजनांचे लाभार्थी, विकासकामांवरील खर्च, भ्रष्टाचार या पारंपरिक मुद्द्यांपेक्षाही या पिढीला भावणारे निवडणुकीतले मुद्दे वेगळेच आहेत.

त्यांच्यावर मोबाइल फोन आणि त्यातील समाज माध्यमांचा मोठा प्रभाव आहे. समाज माध्यमांत सुरू असलेले ट्रेन्ड समजून घेण्यासाठी, ते आत्मसात करण्यासाठी किंवा त्याला योग्य दिशा देण्यासाठी भारतीय जनता पक्षाकडे सर्वात प्रभावी यंत्रणा आहे हे खरंच. पण, तरीही समाज माध्यमांवरून काय कधी फायदा फैलावेल आणि ते या पिढीला भावेल, हे अजून तरी कोणी ठामपणे सांगू शकलेलं नाही. त्यामुळे, बिहारच्या या निवडणुकीत एकूण मतदारांपैकी सुमारे २३ टक्के असलेल्या या मतदाराला कोण कसं हाताळतो, यावर निवडणुकीचा निकाल अवलंबून असेल, असं सध्या तरी म्हटलं जातं आहे. भारतीय जनता पक्षाने त्यासाठीच तेथील लोकगायिका मैथिली ठाकूर हिला आवर्जून पक्षात आणलं असून तिला अलीनगर किंवा बेनिपट्टीतून उमेदवारी दिली जाईल, असा अंदाज आहे. दुसरा महत्त्वाचा मतदार आहे, महिला. मध्य प्रदेश, तेलंगण, महाराष्ट्रात हे सिद्ध झालं आहे. मध्य प्रदेशातील 'लाडली बहन', महाराष्ट्रातील 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' पाहून मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी बिहारमध्येही 'मुख्यमंत्री उद्यमी योजना' आणून प्रत्येक महिलेच्या खात्यात सरसकट दहा हजार रुपये पाठवून दिले आहेत. सरकारने केलेला हा २ हजार १०० कोटींचा खर्च निवडणुकीत किती परिणाम करेल, हे प्रचाराच्या पहिल्या दोन फेऱ्यांतच दिसून येईल. मतदार याद्यांच्या सखोल पुनर्विलोकनाचा मुद्दा गेल्या काही महिन्यांपासून बिहारमध्ये गाजतो आहे.

# संस्थाचालक गोविंदराव वाघ सरांना श्री महालक्ष्मी विद्यालयात श्रद्धांजली अर्पण

## विद्यार्थ्यांसह शिक्षकांच्या डोळ्यात अश्रू...

बीड(प्रतिनिधी) - शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव गोविंदराव दादाराव वाघ सरांना आज गुरुवार दिनांक ९ रोजी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात उपस्थित सर्व शिक्षकवृंदानी साश्रूनयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



बीड शहरातील शहरातील धांडे गल्ली येथील मूळ रहिवासी व सध्या यशवंत नगर भागात स्थायिक असलेले शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव श्री गोविंदराव दादाराव वाघ सर यांचे बुधवार दिनांक ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ०३ वाजण्याच्या सुमारास निधन झाले. आज गुरुवार दिनांक ९ ऑक्टोबर रोजी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात संस्थेचे संस्थापक सचिव गोविंदराव वाघ यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी काही निवडक विद्यार्थी आणि शिक्षकांना आपल्या भावना व्यक्त केल्या. विद्यार्थी आणि शिक्षक आपल्या आठवणींना उजाळा देत होते. त्यावेळी उपस्थितांचे डोळे पाणावले होते. अनेक विद्यार्थी धाय मोकलून रडत होते. श्रद्धांजली अर्पण करताना श्री आत्माराम वाव्हळ सर म्हणाले

आदरणीय गोविंदराव वाघ सर हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व, अजातशत्रू असे व्यक्तिमत्वाचे होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात विद्यार्थ्यांचं कल्याण कसं होईल याच्यावर लक्ष केंद्रित केले होते. त्यांनी आयुष्यभर तन, मन आणि धन लावून अगदी जीव ओतून अध्यापन केले होते. त्यामुळे आज त्यांचे हजारो विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा आप आपल्या कार्यक्षेत्रात काम करत असताना रुजविणे, त्यांनी सांगितलेल्या मार्गाने मार्गक्रमण करणे हिच खऱ्या अर्थाने गोविंदराव वाघ सरांना भावपूर्ण श्रद्धांजली ठरेल असे सांगत आपल्या भावना व्यक्त केल्या. तर कार्यक्रमाचा समारोप करताना शाळेचे मुख्याध्यापक श्री दत्तात्रय चव्हाण सर म्हणाले की, आपल्या संस्थेचे संस्थापक सचिव गोविंदराव वाघ सर अतिशय शांत

सरळ, साधे आणि निर्मळ मनाचे स्वभावाचे होते. त्यांनी संपूर्ण आयुष्यातील शेवटच्या क्षणापर्यंत विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या अडी अडचणी आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा आणि समस्यांचाच विचार केला होता. विद्यार्थ्यांचे प्रश्न, अडचणी आणि समस्या निर्माण झाल्या असतील

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-४८७ दि.२३.०९.२०२५

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान शेख हबीब शेख, रा.खेडगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | हजरा हबीब शेख | मुलगी | १८.०१.१९९३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २३/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-४८८ दि.२३.०९.२०२५

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान शेख हबीब शेख, रा.खेडगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | याकुब हबीब शेख | मुलगा | ११.०५.१९९४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २३/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-४८५ दि.२३.०९.२०२५

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान शेख हबीब शेख, रा.खेडगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | हारूण हबीब शेख | मुलगा | ०५.०६.१९९७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २३/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-४८६ दि.२३.०९.२०२५

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान शेख हबीब शेख मन्नु रा.खेडगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख हबीब शेख मन्नु | स्वतः | ०५.०५.१९६४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २३/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-६२६ दि.०३.१०.२०२५

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान अमोल विष्णु पाचफुले, रा.दुधपुरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शिवतेज अमोल पाचफुले | मुलगा | ०९.०८.१९२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०३/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-६६७ दि.०३.१०.२०२५

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान दिनेश बळीराम पाचफुले, रा.दुधपुरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | तनुजा दिनेश पाचफुले | मुलगी | १३.११.२०१९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०३/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-४८६ दि.२३.०९.२०२५

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान शेख हबीब शेख मन्नु रा.खेडगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | युनूस हबीब शेख | मुलगा | २२.०९.१९९५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २३/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

पान १ वरून...

**'ओबीसीं'चा...**

करण्यात आली होती. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने सरकारला दिलासा देत अंतरिम स्थगिती नाकारली. त्यामुळे मराठा समाजाला तात्पुरता दिलासा मिळाला, पण त्याच वेळी ओबीसी समाजातील असंतोष आणखी वाढला.

पोलिस यंत्रना सज्ज

आझाद मैदानावर जमलेल्या हजारो आंदोलनकर्त्यांनी ओबीसी हक्कांवर कुणीही अतिक्रमण सहन केले जाणार नाही असा इशारा दिला. मराठा समाजाला आरक्षण देण्याचा आम्ही विरोध करत नाही, पण तो कुणबींच्या हक्कांच्या किमतीवर देऊ नका, असे वक्तव्य अनेक समाजनेत्यांनी केले. या आंदोलनात महिलांचा, तरुणांचा आणि विद्यार्थ्यांचाही उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. अनेक आंदोलनकर्ते पारंपरिक कुणबी पोशाखात आले होते. बॅनर, झेंडे आणि घोषणांनी संपूर्ण मैदान दणाणून गेले. काही ठिकाणी पोलिसांनी वाहतूक वळवून परिस्थिती नियंत्रणात ठेवली. मुंबई पोलिसांनी सुरक्षेचे व्यापक बंदोबस्त केला असून, आझाद मैदान आणि आसपासच्या परिसरात सुमारे १,००० हून अधिक पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

सरकारकडून चर्चेचे संकेत

राज्य सरकारने या आंदोलनाची गंभीर दखल घेतली आहे. सामाजिक न्याय विभाग आणि ओबीसी कल्याण विभागाच्या अधिका-यांना चर्चेसाठी जाण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिस्थितीचा आढावा घेतला असून, पुढील काही दिवसांत कुणबी प्रतिनिधींशी बैठक होण्याची शक्यता आहे. तथापि, कुणबी समाजाच्या नेत्यांनी जोपर्यंत शासन निर्णय मागे घेतला जात नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, अशी ठाम भूमिका घेतली आहे.

**बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे...**

आहे. भावरत्न समाधान महाराज शर्मा यांच्या मधूर वाणीतून सुरु असलेल्या भागवत कथेमुळे गेवराईचे वातावरण भक्तिमय झाले आहे. अनेक नामांकित किर्तनकारांची सेवा सप्ताहभर सुरु आहे.

शुक्रवार दि.१० ऑक्टोबर रोजी सकाळी १० वा. राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ (नाना) बागडे यांच्या हस्ते माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांचा अभिष्टचिंतन सोहळा समितीच्या वतीने भव्य सत्कार आयोजित करण्यात आला आहे. यावेळी श्री क्षेत्र नारायणगड संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.शिवाजी महाराज, श्री क्षेत्र चाकरवाडीचे ह.भ.प. महादेव महाराज यांच्यासह साधु, संत-महंत आणि गेवराई तालुक्यातील वारकरी सांप्रदायात काम करणारे किर्तनकार, गायक, वादक यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

पान १ वरून...

काल्याचे कीर्तन आणि महाप्रसादाने होणार कीर्तन महोत्सवाचा समारोप

माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात गेवराई विधानसभा मतदार संघातील सर्व साधु, संत-महंत, किर्तनकार यांचाही हृदय सत्कार अभिष्टचिंतन सोहळा समितीच्यावतीने करण्यात येणार आहे. वाढदिवसानिमित्त होणाऱ्या भव्य सत्कार समारंभानंतर ह.भ.प.शिवाजी महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसाद वाटप केला जाणार आहे भाविक भक्तांनी त्याचा लाभ घेण्याचे आवाहनही आयोजन समितीने केले आहे.

कार्यकर्ते एकत्र येऊन
करत आहेत दादांचे अभिष्टचिंतन

शिवाजीराव पंडित आणि शिवछत्र परिवारावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी एकत्र येवून अभिष्टचिंतन सोहळा समितीच्या माध्यमातून मागील तीन वर्षांपासून किर्तन महोत्सवाचे यशस्वी आयोजन केले आहे. र.भ.आट्टल महाविद्यालयाच्या मैदानावर उभारलेल्या शिवनगरीत गेल्या सप्ताहभर सुरु असलेल्या किर्तन महोत्सवाला भाविक भक्तांनी मोठा प्रतिसाद दिला आहे. याप्रसंगी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अभिष्टचिंतन सोहळा समितीच्या समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**श्री.तुळजाभवानी ..**

निमित्ताने भोपा येथे भव्य कुस्तीचा दंगलीचे आयोजन करण्यात येते. दहा रुपयांपासून पाच हजार एक रुपयांचे बक्षीस जिंकणाऱ्या मल्लास आयोजक मानधन स्वरूपात देतात. मंगळवारी आयोजित दंगलीत अनेक रोमांचकारी सामने या पाहायला मिळाले. राहुल लगड, लखन बडे, सिद्धेश्वर बडे, श्रावण खोत, बंटी लटपटे, धनराज देशमुख, ऋषिकेश मेंडके, अविनाश जाधव, सुनील बडे यांची झालेली कुस्ती विशेष रोमांचकारी होती. कुस्त्यांच्या फडातील शेवटची दंगल लखन बडे देवदहिफळ व राहुल लगड तेलगाव यांच्यात बरोबरीची सोडण्यात आली. बक्षिसाची रक्कम दोघात विभागून देण्यात आली. येथील पोलीस पाटील सत्यनारायण वाघचौरे, सरपंच अंकुश तिडके, भगवान वाघचौरे, भागवत वाघचौरे, राजेभाऊ वाघचौरे यांनी दंगलीचे नियोजन केले. पंच म्हणून शेख गफार, ननूमिया शेख, नारायण घडगे, बाबासाहेब काळदाते यांनी दंगलीत अचूक निकाल दिले. महादेव मुजमुले, हनुमान भोसले यांनी आपल्या पहाडी आवाजात केलेले सूत्रसंचालन सर्वांचे लक्ष वेधत होते. दिंद्रुड पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवत दंगलीचा कार्यक्रम शांततेत पार पडला.

**श्री शिवानंद आश्रम..**

दररोज पठण, पारायण, शिवपाठ, भजन-कीर्तन, गुरुआमृत उपदेश अशा कार्यक्रमांनी ही यात्रा दरवर्षी भक्तिभावाने रंगते. यात्रेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक भक्ताला शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक समाधानाचा अनुभव मिळतो.

पान १ वरून...

साधू संत तुझे अवतार जाण तयाती शरण नाही गेलो.जाती-कुळगोत्र न पाहे शंकर, भक्तांचा माहेर स्वामी माझा. तमलूरहून सुरू होणारी ही पदयात्रा नरंगल, देगलूर, कावळगाव, करडखेड, मुक्रमाबाद, हाळणी, उदगीर, लोहारा, चामरगा, रेणापुर, बर्दापूर, आंबेजोगाई, धारूर, विडा, कळसंबर, रत्नागिरी मार्गे श्रीक्षेत्र कपिलाधार येथे पोहोचेल.

एकूण २८० किलोमीटरचा प्रवास १२ दिवसांत पायी पार केला जाणार असून प्रत्येक गावात स्थानिक भक्तांकडून भाविकांसाठी राहण्याची, फराळाची आणि प्रसादाची व्यवस्था केली जाते.या भक्तिपूर्ण यात्रेचा शिस्तबद्ध, आनंददायी आणि अध्यात्मिक वातावरणात पार पडण्यासाठी सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक मंडळाकडून करण्यात आले आहे.



# केंद्रीय युवा महोत्सवात 'पाझर' एकांकिकेला प्रथम पारितोषिक

बीड /प्रतिनिधी

श्रीमती नाथिबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई येथे पार पडलेला राज्यस्तरीय केंद्रीय युवा महोत्सव रविवारी जल्लोषात संपन्न झाला. ४ ते ५ ऑक्टोबरदरम्यान पार पडलेल्या या महोत्सवात प्रादेशिक पातळीवर विजेते ठरलेल्या संघांनी विविध कलाप्रकारांमध्ये सहभाग नोंदवला.

या महोत्सवात तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीडच्या विद्यार्थिनींनी आपल्या अभिनयातून समाजातील स्त्रीच्या वास्तवाला वाचा फोडली. त्यांच्या पाझर या हृदयस्पर्शी एकांकिकेने परीक्षकांची मनं जिंकत पहिला क्रमांक पटकावला.

या नाट्यप्रयोगातून ग्रामीण स्त्रीजीवनातील संघर्ष, आत्मसन्मान आणि सामाजिक वास्तवाचे जिवंत चित्रण प्रभावीपणे साकारण्यात आले. उत्कृष्ट अभिनय, प्रभावी संवाद आणि दिग्दर्शनामुळे पाझर ने परीक्षक तसेच प्रेक्षकांवर ठसा उमटवला.

या विजयामुळे महाविद्यालयीन परिसरात जल्लोषाचे वातावरण असून शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे यांनी संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या मेहनतीचे कौतुक केले.

# एकनाथ शिंदेंचा बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात; शेकडो शेतकऱ्यांना मदत किटचे वाटप

## मदतीचे तोरण हेच शिवसेनेचे धोरण- राजेश कदम

बीड /प्रतिनिधी

अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीने शेतकरी व नागरिक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. या भीषण परिस्थितीत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरणा मानत महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसद रत्न खासदार मा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेकडून पूरग्रस्तांना मदतीचा हात देण्यात आला.

शिवसेना कल्याण लोकसभा मतदारसंघातील कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्या नेतृत्वाखाली दि. ९ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता सिंदफना नदीकाठच्या पूरग्रस्त गावातील शेतकऱ्यांना मदत कीट वाटप करण्यात आले. या उपक्रमाद्वारे पूरग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्याचे कार्य करण्यात आले. या वेळी ठाणे उपजिल्हाप्रमुख राजेश कदम आणि बीड शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले की, मदतीचे तोरण हेच शिवसेनेचे धोरण आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मदतीचा हात पुढे केला आहे.

मदत वाटप कार्यक्रमापूर्वी शिवसेना




पदाधिकाऱ्यांनी पंचक्रोशीतील पूरग्रस्त भागाची पाहणी केली. या वेळी उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, डोंबिवली नगरसेवक राजन मराठे, नगरसेवक अंबरनाथ सुभाष साळुंखे, डोंबिवली युवासेना अध्यक्ष सागर जेधे, उपतालुका प्रमुख राहुल गणपुले, युवासेना विधानसभा अध्यक्ष सूरज मराठे, संजय निकते आदी पदाधिकारी उपस्थित होते. तसेच जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, बीड कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती शामसुंदर पडुळे, शिवसेना, युवासेना, व्हीजेएनटी सेना, शेतकरी सेना व एसटी कामगार सेनेचे पदाधिकारी तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे शिवसेनेने पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेत आपले सामाजिक बांधिलकीचे धोरण अधोरेखित केले.

## प्रिमॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेसाठी विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरण्याचे आवाहन

लातूर : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून इयत्ता पाचवी ते दहावीच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रिमॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज भरणेसाठी महाडीबीटी पोर्टल सुरु करण्यात आलेले आहे. सरल पोर्टलद्वारे महाडीबीटी पोर्टलवर सर्व विद्यार्थ्यांचा डेटा उपलब्ध करुन दिलेला आहे.

तरी पात्र शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे अर्ज मुख्याध्यापक यांनी तात्काळ महाडीबीटी पोर्टलवर भरून ऑनलाईन भरलेले अर्ज महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कार्यालय, लातूर यांचेकडे मंजुरीसाठी पाठवावेत, असे आवाहन लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण सहायक संचालक अभय अटकळ इतर यांनी केले आहे.



## पालकांनी आपल्या मुलांना संस्कारक्षम व सर्वगुणसंपन्न बनवावे -डॉ. सारीका क्षीरसागर

सौ.के.एस.के.महाविद्यालायत विद्यार्थी शिक्षक पालक मेळावा संपन्न

बीड /प्रतिनिधी

मुले ही आई वडीलांच्या सवयीनुसार वाढतात पालकांनी मुलांना वाईट सवयी लागू नये म्हणून जबाबदारीने चांगले संस्कार दिले पाहिजेत. मुलांना संस्कारक्षम बनवणे व त्यांच्या समस्या समजून घेणे यासाठी पालकांनी संस्कारक्षम व सर्वगुण संपन्न बनवण्यासाठी स्वतः प्रयत्नशिल असावे. असे प्रतिपादन नवगण शिक्षण संस्थेच्या संचालक डॉ. सारीका क्षीरसागर यांनी सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात संपन्न झालेल्या विद्यार्थी शिक्षक पालक मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी केले.

या कार्यक्रमाला मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा अहवाल सांगितला व पालकांनी आपल्या विद्यार्थ्यांना वर्गात पाठवावे जेणे करुन विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण स्वरुपाचा विकास महाविद्यालयाकडून केला जाईल. त्याचबरोबर मुलींच्या सुरक्षेतेची काळजी आम्ही घेतो असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे यावेळी त्यांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या सर्व शाखांचा अहवाल पालक विद्यार्थी यांच्या समोर सादर केला. त्याबरोबरच नियमीत तासीकेचे महत्व त्यांनी पटवून दिले. पालक प्रतिनिधी म्हणून श्री. परमेश्वर पवळ व सोनल पटेल जोशी, विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून गितांजली शेळके यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी मंचावर नवगण शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. विश्वांबर देशमाने, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर संचालक डॉ. अनसारउल्ला खान, पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर, पालक प्रतिनिधी श्रीमती अर्चना देशमुख आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. अनिता वैद्य यांनी केले तर आभार कर्मचारी प्रतिनीधी प्रा. प्रदीप साळुंके यांनी केले. यावेळी विद्यार्थी पालक शिक्षक व शिक्षक शिक्षकेत्तर मोठया संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य आणि पंचायत समिती सभापती आरक्षण सोडत सोमवारी

लातूर /प्रतिनिधी

जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य पदाच्या आरक्षण निश्चितीसाठी जिल्ह्यात १३ ऑक्टोबर २०२५ रोजी आरक्षण सोडतीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषद सदस्य आणि पंचायत समिती सभापती पदासाठी आरक्षण सोडत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात १३ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता होईल. तसेच पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत संबंधित तालुक्याच्या ठिकाणी निश्चित केलेल्या ठिकाणी याच दिवसी सकाळी ११ वाजता होणार आहे. तरी जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीतील ज्या रहिवाशांची आरक्षण सोडतीच्या सभेस उपस्थित राहण्याची इच्छा आहे, त्यांनी या आरक्षण सोडत सभेस उपस्थित राहण्याचे अवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे.

राज्य शासनच्या ९ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या अधिसुचनेनुसार लातूर जिल्हा परिषद अंतर्गत पंचायत समिती सभापती पदासाठी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी एक, अनुसुचित जाती प्रवर्गातील महिलेसाठी एक, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) एक, नागरिकांचा मागास प्रवर्गातील (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) महिलेसाठी दोन, सर्वसाधारण प्रवर्गासाठी तीन, सर्वसाधारण प्रवर्गातील महिलेसाठी दोन असे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार आरक्षण सोडत होईल.

जिल्ह्यात १३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता लातूर पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत लातूर पंचायत समितीमधील तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात, औसा पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत औसा तहसील कार्यालय परिसरातील प्रशासकीय इमारतीमधील सभागृहात, रेणापूर पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत रेणापूर पंचायत समितीच्या बैठक सभागृहात, अहमदपूर पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत अहमदपूर येथील नवीन प्रशासकीय इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील बैठक हॉलमध्ये, चाकूर पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत चाकूर पंचायत समिती सभागृहात, उदगीर पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत उदगीर येथील हावगीस्वामी महाविद्यालय जवळील शासकीय विश्रामगृह येथील बैठक हॉलमध्ये, जळकोट पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत जळकोट प्रशासकीय इमारतीमध्ये, निलंगा पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत निलंगा तहसील कार्यालय येथील तिसऱ्या मजल्यावरील बैठक सभागृहात, शिरूर अनंतपाळ पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत शिरूर अनंतपाळ तहसील कार्यालय येथे आणि देवणी पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण सोडत देवणी पंचायत समिती सभागृहात होईल.

जिल्हा परिषद व पंचायत समिती आरक्षणाचे प्रारूप १४ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध केले जाईल. या जिल्हा परिषद व पंचायत समित्यामधील निवडणूक विभागाच्या (गट) प्रारुप आरक्षणाबाबतच्या हरकती व सूचना जिल्हाधिकारी यांचेकडे आणि पंचायत समिती निर्वाचक गणाच्या (गण) प्रारुप आरक्षणाच्या हरकत व सूचना संबंधित तालुक्याचे तहसिलदार यांच्याकडे १४ ते १७ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत द

# महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी समिती कटिबद्ध

महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती प्रमुख मोनिका राजळे

मुंबई /प्रतिनिधी

समस्याग्रस्त व गरजू महिला आणि बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीच्या माध्यमातून सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल, असे समितीच्या प्रमुख तथा आमदार मोनिका राजळे यांनी सांगितले. महिला व बालकांचे आरोग्य, शिक्षण, सुरक्षा आणि पुनर्वसनसंदर्भात योग्य सुविधा देण्यात येत असून, अधिक परिणामकारक व दीर्घकाळ उपाययोजना राबविण्यासाठी शासनास योग्य शिफारसी करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

समितीने मुंबईतील भायखळा कारागृह, शताब्दी रुग्णालय (गोवंडी),




बालसुधारगृह आणि महिला सुधारगृह (मानखुर्द) तसेच शहाजी मॅटर्निटी हॉस्पीटल (मानखुर्द) या संस्थांना भेट देऊन पाहणी केली. या भेटीदरम्यान महिला व बाल विकास विभाग आणि नगरविकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा घेण्यात आला.

या प्रसंगी आमदार मोनिका राजळे, सीमा हिरे, ड. श्रीजया चव्हाण, रंजना जाधव, सरोज आहिरे, सना मलिक, महेश सावंत, डॉ. ज्योती गायकवाड, चित्रा वाघ, डॉ. प्रज्ञा सातव, सुनिल शिंदे, डॉ. मनीषा कायंदे, मुंबई शहराच्या महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार, उपनगराचे अधिकारी संजय धनगर, उपायुक्त सुवर्णा पवार, ठाण्याच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नमिता शिंदे, प्रेमा घाटगे आदी उपस्थित होते.



## वडवणी येथे सहकारी पतसंस्था संचालक व कर्मचारी यांचा दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग संपन्न

बीड/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म.पुणे चे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर,व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने वडवणी तालुक्यातील नागरी सहकारीपतसंस्था, पगार सहकारी पतसंस्था संचालक,कर्मचारी यांच्या करीता दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामलिंग नागरी सहकारी पतसंस्थे चे अध्यक्ष नारायणराव डिगे होते.प्रशिक्षण वर्गात प्राचार्य डॉ.मन्मथ हेरकर, माजी संचालक गजानन नागरी सहकारी बँक बीड, सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर चे उपप्राचार्य एस. आर.कोळे,प्रमाणित लेखा परीक्षक सी.ए.खोडसे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

समारोप प्रसंगी ए.एस. देशपांडे,सहकार अधिकारी श्रेणी २, प्रमाणित लेखा परीक्षक सी.ए.खोडसे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन,आभार प्रदर्शन वर्ग संयोजक एस. आर.कोळे उपप्राचार्य सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर यांनी केले.

# अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकांचे ऑक्टोबर महिन्याचे वेतन वाढीव टप्प्यानुसार करा

### बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीचे शिक्षणाधिकारी आणि वेतन अधीक्षकांना निवेदन !

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील कार्यरत असणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अनुदानाचा

२०% वाढीव टप्पा शासनाने मंजूर केला आहे. शिवाय ०१ ऑगस्ट २०२५ पासून या शिक्षकांच्या खात्यात वाढीव टप्प्यानुसार वेतन देण्याचे शासनाने जाहीर केले. परंतु अद्यापही २० टक्के वाढीव टप्प्यानुसार या शिक्षकांच्या खात्यात वेतनाची रक्कम जमा झाली नाही. किमान दिवाळी सणाच्या निमित्ताने या सर्व शिक्षकांचे वेतन २० टक्के वाढीव टप्प्यानुसार व्हावे, त्यासाठी लागणाऱ्या निधीची शासनाकडे मागणी करावी या मागणीचे निवेदन बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांच्यासह वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांना निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्हयातीलअंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकांचे ऑक्टोबर महिन्याचे वेतन वाढीव टप्प्यानुसार करा या मागणीचे निवेदन बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने जिल्हा परिषद माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील मॅडम आणि वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांना दिले. त्यानंतर शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम पदाधिकाऱ्यांशी बोलताना म्हणाल्या की, राज्यातील सर्व विनाअनुदानित शिक्षकांची दिवाळी गोड करण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे. त्या दृष्टीने काम सुरू आहे. जिल्ह्यातील अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्प्याप्रमाणे वेतन त्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी आम्ही वरिष्ठ



कार्यालयाच्या सातत्याने संपर्कात आहोत. त्यांचे योग्य मार्गदर्शन मिळताच क्षणांचा ही विलंब न करता आपले वाढीव टप्प्याप्रमाणे वेतन देऊन सर्व अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या खात्यात त्यांचे हक्काचे वेतन जमा करू असे आश्वासन दिले. दुसरीकडे वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांना ही निवेदन दिले. या वेळी त्यांनी पदाधिकाऱ्यांना आपली मागणी वरिष्ठ कार्यालयाकडे कळवली जाईल व वाढीव टप्प्यासाठी लागणारा आवश्यक निधीची मागणी करून अंशतः अनुदानित शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी वेतन जमा करणार असल्याचे सांगितले. दोन्ही अधिकाऱ्यांनी दिवाळीच्या पूर्वी वाढीव टप्प्याप्रमाणे वेतन खात्यात जमा होणार या

दिलेल्या आश्वासनांमुळे निश्चितच दिवाळी गोड होईल असा विश्वास व्यक्त करत जिल्ह्यातील अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

या निवेदनावर विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा अध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, महिला आघाडीच्या मराठवाडा सचिव श्रीमती मुक्ता मोटे मॅडम, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे, प्राचार्य तुकाराम खाडे, बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, बीड जिल्हा कार्याध्यक्ष प्रताप पवार, जिल्हा उपाध्यक्ष रामदास जामकर, अरविंद सौंदलकर, जिल्हा सचिव शेख सर, श्री देशमुख, बीड तालुका अध्यक्ष भागवत यादव, बाळासाहेब नागरगोजे, सय्यद रिजवान, अशोक मोरे, सुरेश कदम, पृथ्वीराज राऊत, नितीन बिनवडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## आदित्य दंत महाविद्यालय, बीडचा विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये ठसा

## चार खेळाडूंची आंतरक्षेत्रीय स्पर्धांसाठी निवड

प्रतिनिधी । बीड

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (चणकड), नाशिक यांच्यावतीने जालना येथील क्रीडा संकुलात ३ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये आदित्य दंत महाविद्यालय, बीडने उल्लेखनीय कामगिरी करत आपली ओळख ठळकपणे अधोरेखित केली. महाविद्यालयाचे २१ विद्यार्थी विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी झाले होते, यापैकी चार खेळाडूंनी आंतरक्षेत्रीय स्पर्धांसाठी पात्रता मिळवली आहे.

यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे मुख्य प्रवर्तक



सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी अभिनंदन करत त्यांच्या उत्कृष्ट खेळाडू वृत्तीला दाद दिली. सुभाषचंद्र सारडा म्हणाले की, विद्यार्थ्यांचे हे यश केवळ महाविद्यालयासाठी नव्हे तर संपूर्ण बीड जिल्ह्यासाठी गौरवाचे आहे. महाविद्यालयाच्या मुलींच्या व्हॉलीबॉल संघाने उत्कृष्ट कामगिरी करत उपांत्य फेरीत प्रवेश केला आणि स्पर्धेत दुसरे स्थान पटकावले.

विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर खेळाच्या मैदानातही गुणवत्ता सिद्ध केली - डॉ. आदिती सारडा

आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या संचालिका डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत त्यांना भविष्यात अशा स्पर्धांमध्ये अधिक संधी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता खेळाच्या मैदानातही आपली गुणवत्ता सिद्ध केल्याचे त्या म्हणाल्या. हा आत्मविश्वास त्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाविद्यालयाच्या या यशाने संपूर्ण परिसरात अभिमानाची भावना निर्माण झाली असून विद्यार्थ्यांचे हे यश भविष्यातील अनेक युवा खेळाडूंना प्रेरणादायी ठरणार असल्याचेही त्या म्हणाल्या.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने केज येथे विजयादशमी निमित्त पथ संचालन व शस्त्र पूजन उत्सवाचे आयोजन

केज/प्रतिनिधी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, केज यांच्या वतीने यावर्षीचा विजयादशमी व शस्त्रपूजन उत्सवाच्या निमित्ताने पथ संचालन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.हा उत्सव रविवार दि.१२ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडणार असून स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल, संघ कार्यालय शेजारी, धारूर रोड,केज येथून सायंकाळी ५.०० वाजता सहघोष पथ संचलन निघणार आहे.यानंतरचा मुख्य कार्यक्रम वकीलवाडी हनुमान मंदिर केज येथे सायंकाळी ६ वाजता होणार आहे. या कार्यक्रमासाठी सुप्रसिद्ध कृषीतज्ञ श्री.विकासजी मिरगणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत,तर देवगिरी प्रांत सह-सद्भाव प्रमुख श्री. आनंदजी गुजर हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत.

संघाचे तालुका संघचालक डॉ. दत्ता डिसले यांनी दिलेल्या माहिती नुसार,विजया दशमी हा भारतीय संस्कृतीचा गौरवशाली उत्सव असून असत्यावर सत्याचा आणि अन्याया वर न्यायाचा विजय याचा तो संदेश देतो.सामाजिक ऐक्य आणि राष्ट्रनिर्माणा साठी हा दिवस विशेष महत्त्वाचा मानला जातो.

या वर्षी संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त पंच परिवर्तन या संदेशासह समाज परिवर्तनाची वाटचालसुरू ठेवण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या निमित्ताने माता-भगिनींसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी कार्यक्रमासाठी सर्व नागरिकांना सहकुटुंब सह परिवार उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ,केज तर्फे करण्यात आले आहे.हे पथ संचालन जेथुन जाणार आहे त्या रस्त्यावर रांगोळी काढून पथ संचालन वर पुष्प वर्षाव करण्यात येणार आहे अशी माहिती महिला भगिनी यांनी प्रतिनिधींशी बोलताना दिली आहे.

# रमाई आवास घरकुल योजनेचे लाभार्थी दोन वर्षापासून घराच्या प्रतीक्षेत

# मागासवर्गीयांना हक्काच्या घराचा लाभ मिळेना; दलितांचे पुढारी गप्प ?

तलवाडा /प्रतिनिधी

गरीब,गरजू,मागास कुटुंबातील बेघर,वंचित कुटुंबाला शासनाकडून मिळणारे हक्काचे घर हे रमाई घरकुल आवास योजने मधून प्रत्येक वर्षी लाभ देण्यात येतो मागील दोन वर्षापासून तलवाडा येथील लाभार्थ्यांना लाभ मिळाला नाही,मागच्या गत दोन वर्षापूर्वी काही स्थानिक पुढाऱ्या मुळे ही योजना बारगळली,त्या नंतर गेल्या वर्षी नव्याने नाव दाखल करण्यासाठी ठराव देण्याचे ठरले तेव्हा ही,मागास समाज बांधवांकडून दहा हजार लाभार्थी असे पैसे घेऊन त्यांना लाभ देण्यासाठी चढावढ झाली.,ही यादी बोगस ग्रामसभा दाखवून आणि पात्रता नसलेला सचिव नेमून सभा कागदोपत्री दाखवली यामध्ये यादी तयार केली त्याचे प्रस्ताव दाखल करण्यात आले,ते काही ऑनलाइन ही करण्यात आले असून अद्याप रमाई आवास घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना अग्रिम हप्ता देण्यात आला नाही.याबाबत पंचायत समितीचे ऑपरेटर यांना वारंवार सांगून ही हप्ते टाकण्यात आलेले नाहीत,काही लाभार्थ्यांचे खाते भरले नाहीत,अनेक लाभार्थ्यांच्या नावा मध्ये बदल करण्यात आला ही शोकांतिका आहे तलवाडा गावाला कोणी वाली नाही,पण गावात स्वतःला आपण पुढारी आहोत हे समजणारे तरी बोलणार आहेत का ? का गाव वाऱ्यावर सोडले आहे..मागच्या काळात ज्यांच्या हाती सत्ता होती ते अजून सत्ताधारी आम्हीच होणार अशी स्वप्न पाहत आहेत असल्याने सामान्य जनतेला लाभ कधी मिळणार हा खरा प्रश्न आहे.

मागासवर्गीय लाभार्थ्यांना आपल्या हक्काचे घर मिळावे त्यांना लाभ द्यावा या उद्देशाने रमाई आवास घरकुल योजना सुरू आहे यध्ये प्रत्येक वर्षी बेघर,वंचित कुटुंबांना घराचा लाभ




ग्रामपंचायत स्तरावरून ग्रामसभा घेऊन ठराव मध्ये नाव घेऊन देण्यात येतो,परंतु अनेक ठिकाणी मागासवर्गीय लाभार्थ्यांना बेघर,वंचित कुटुंबाला आपल्या हक्काचे घर मिळावे यासाठी मोठा संघर्ष करावा लागतो,अनेक ठिकाणी आपले नाव घरकुल यादी मध्ये यासाठी दहा दहा हजार रुपये द्यावे लागतात यावेळी दलितांचे नेते आणि पदाधिकारी गप्प बसून गरिबांचे हाल पाहतात ही शोकांतिका आहे असे समाजाचे लोक बोलून दाखवतात.मागील दोन महिन्यापूर्वी तलवाडा ग्रामपंचायत मधून पोइतांडा ग्रामपंचायत वेगळी झाल्याने तलवाडा येथील कार्यकारी मंडळ बरखास्त झाले असल्याने तलवाडा याठिकाणी प्रशासक आहे,त्यामुळे त्यांना काही माहिती नाही आणि देणेघेणे ही नाही परंतु सर्वात सामान्य नागरिकांचे हाल होत आहेत, पीएमवाय घरकुल योजनेचे लाभार्थी ही हप्त्यासाठी परेषण आहेत .याकडे कोणीच लक्ष देत नाहीत,सध्या सेल्फ सर्वे घरकुल योजनेचे यादी मधील लाभार्थ्यांचा मुद्दा समोर असून सेल्फ सर्वे करण्यात आलेल्या लोकांकडून व्हेरिफिकेशन च्या नावाखाली एक हजार ,दोन हजार रुपये घेतल्याची जोरदार चर्चा असून भावी फक्त बघ्याची भूमिका घेत आहेत तर मगचे आम्हाला काही माहीत नाही असे बोलत आहेत.त्यामुळे सामान्य माणसाला कोणी वाली नसल्याचे दिसून येत असून याबाबत अनिरुद्र सानप गटविकास अधिकारी पंचायत समिती गेवराई यांनी लक्ष देऊन उचित कार्यवाही करावी आणि सामान्य माणसाला न्याय द्यावा

### मागासवर्गीय लाभार्थ्यांना त्रास दिल्यास जनआंदोलन उभा करू - भास्कर हातागळे

रमाई घरकुल आवास योजना ही सामान्य गरीब,गरजू मागासवर्गीय कुटुंबासाठी आहे जे कुटुंब बेघर आहेत,राहण्यासाठी घर नाही,त्यांना आपल्या हक्काचे घर असावे ही भावना सरकार ने डोळ्यासमोर ठेवून राबवली आहे.परंतु यामध्ये गाव पुढाऱ्यांनी राजकारण करून वंचित समाजाला वेठीस धरण्याचे काम केले आहे.त्यामुळे येत्या काळात जर रमाई आवास घरकुल योजनेत कोणी राजकारण केले तर आम्ही सहन करणार नाहीत,आणि गेवराई पंचायत समिती कार्यालय येथे मागासवर्गीय लाभार्थ्यांना त्रास दिल्यास जनआंदोलन उभारू असा इशारा ग्राम संवाद सरपंच संघटनेचे संपर्क प्रमुख तथा गंगावाडी ग्रामपंचायत चे सरपंच भास्कर हातागळे यांनी दिला आहे.



## सौ. के.एस.के. महाविद्यालयाची तायक्वाँदो स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी

बीड /प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व आय.बी.पी. महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरमहाविद्यालयीन तायक्वाँदो स्पर्धेत सौ. के.एस.के महाविद्यालयाचा देवेंद्र जोशी यांने ६८ किलो वजनगटात एकतर्फी विजय संपादीत करुन प्रथम क्रमांक मिळवत सुवर्ण पदक प्राप्त केले. तर कांबळे प्रतिक या खेळाडूने ६३ किलो वजनगटात अंतिम फाईटमध्ये कडवी झुंज देत द्वितीय क्रमांक मिळवत सिल्वर पदक प्राप्त केले. तर सागर केळगंद्रे या खेळाडून ५४ किलो वजनगटात उपांत्यफेरी पर्यंत उत्कृष्ट अशा दोन फाईटमध्ये नेत्रदिपक कामगिरी केली. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या संघातून देवेंद्र जोशी हा ६८ किलो वजन गटात विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणार आहे.

खेळाडूंच्या या कामगिरीबद्दल नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर, माजी नगराध्यक्ष डॉ. भारतभुषण क्षीरसागर, संचालक डॉ. सारीका क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वांभर देशमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, कमवि चे उपप्राचार्य नारायण काकडे, पर्यवेक्षक श्री जालिंदर कोळेकर, क्रीडा विभागप्रमुख डॉ. भागचंद सानप, अमृतसिंग बिसेन, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी यांनी खेळाडूंचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.


# बीड जिल्हास्तर शालेय कबड्डी क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

बीड /प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड व जिल्हा क्रीडा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बीड जिल्हा स्तरीय शालेय कबड्डी क्रीडा स्पर्धा २०२५-२६ दि ०७ व ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल इनडोअर हॉल येथे उत्साहात संपन्न झाल्या. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बीड शहर पोलिस निरीक्षक मा. शितलकुमार भल्लाळ तसेच बीड ग्रामीण सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे यांची उपस्थिती लाभली, तसेच स्पर्धेसाठी पंचप्रमुख महादेव रकटे, भिमराव माने, अभिजित तांदळे, सतिश उबाळे, प्रताप शेंडगे,जनार्धन काळे, अमोल तांदळे, बापु गाडीवाल, अंकुश गव्हाने, शुभम कादे, सोमा गायकवाड, गणेश पवार, प्रियंका नवले, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत बीड तालुका क्रीडा अधिकारी रेवन्नाथ शेलार व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे क्रीडा संयोजक जितेंद्र आरक यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करून स्पर्धेचे उद्घाटन संपन्न झाले. सदरील स्पर्धेत बीड जिल्हा अंतर्गत विविध शाळा व महाविद्यालयांच्या १४/१७/१९ वर्ष आतील मुले व मुलींनी सहभाग नोंदवत विशेष कामगिरी केली.

वरील वयोगटातील संघांनी मारलेल्या बाजीमुळे हे संघ विभागस्तरीय होणार्या स्पर्धेसाठी पात्र ठरले. हे संघ छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या विभाग स्तरीय कबड्डी स्पर्धेत बीड जिल्हाचे प्रतिनिधीत्व करणार आहेत.वरील सर्व संघ, त्यांचे विद्यालय,महाविद्यालय तसेच त्यांचे प्रशिक्षक,मार्गदर्शक यांना प्रमुख पाहुणे, उपस्थित मान्यवर व कार्यालयाच्या वतीने पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सदरील स्पर्धा यशस्वीरीत्या आयोजन करण्या करीता विशाल साळुंके व मंगेश वडमारे यांचे विशेष सहकार्य लाभले. सदरील शालेय क्रीडा स्पर्धा या जिल्हा क्रीडा अधिकारी मा. अरविंद विद्यागर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आल्या





धर्माबाद - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांना मुंबई येथे 'न्यू जयभारत शिक्षण प्रसारक मंडळ'च्या वतीने आमदार राजेशजी पवार साहेबांनी अतिवृष्टीग्रस्तांसाठी 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी'मध्ये २१,००,००० देणगीचा धनादेश सुपूर्द केला.यावेळी सौ.पूनमताईजी पवार, चिरंजीव दिग्विजय भैय्या यांची उपस्थिती होती.यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पवार कुटुंबीयांचे आभार मानले.




## बाबासाहेबांनंतर बहुजन समाजाला जागृत करण्याचे काम मान्यवर कांशीराम साहेबांनी केले-प्रशांत वासनिक

बीड /प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील साडेसहा हजार जातींना एकत्र करण्यासाठी प्रवर्गाची निर्मिती करून बहुजन समाजाच्या एकत्रित करण्याचे काम सुरू केले होते या गोष्टीला देशातील मनुवादी व्यवस्थेने ओळखले होते. म्हणून त्यांनी अनेक जातीच्या लोकांना बाबासाहेबांच्या विरोधात उभे केले.बाबासाहेबां बद्दल अपप्रचार करून मनूवादी मानसिकतेच्या लेखकांद्वारे त्यांच्यावर खोटे साहित्य देखील निर्माण करण्याचे काम केले कारण बाबासाहेबांच्या विचारधारेवर जर बहुजन समाज एकत्र झाला तर तो मनूवादी व्यवस्थेच्या विरोधात विद्रोह करेन अशाप्रकारे व्यवस्थेने वेगवेगळ्या जातींना बाबासाहेबांच्या विरोधात उभे केले परंतु बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्याचा अभ्यास करून बाबासाहेबांना प्रत्यक्षात काय करायचे होते हे समजून घेतले व त्या दिशेने आपला कृतिशील कार्यक्रम सुरू केला.कांशीराम साहेबांनी काश्मीर ते कन्याकुमारी सायकलवर प्रवास करून गाव खेड्यापर्यंत महापुरुषांची विचारधारा पोहोचविण्याचं व रुजवण्याचं काम केलं.समाजातील कर्मचारी अधिकाऱ्यांना बाबासाहेबांच्या उपकारांची जाणीव करून दिली व त्या कर्मचाऱ्यांची काय जबाबदारी आहे हे समजून सांगितले व देशांमधील तमाम ८५ टक्के बहुजन समाजातील कर्मचारी अधिकाऱ्यांना एकत्र करून बामसेफ नावाचं संघटन निर्माण केलं.

या बामसेफच्या माध्यमातून देशभरामध्ये महापुरुषांच्या विचाराचं वादळ निर्माण करण्याचं काम मान्यवर कांशीराम साहेबांनी केलं.

त्यानंतर फक्त सामाजिक संघटन निर्माण करून कांशीराम साहेब थांबले नाहीत तर त्यांनी बहुजन समाज पक्षाची निर्मिती करून उत्तर प्रदेश सारख्या जातीवादी राज्यांमध्ये महापुरुषांच्या विचारावर तब्बल चार वेळा सरकार स्थापन करण्याचे काम केलं. व बहन कुमारी मायावतीजी सारख्या कर्तबगार व दमदार स्वाभिमानी नेता आपल्या समाजाला दिला.उत्तर प्रदेश मध्ये चार वेळा बहन कुमारी मायावती जी मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी उत्तर प्रदेश मध्ये सर्वत्र महापुरुषांच्या विचारांची पेरणी केली व महापुरुषांच्या विचारांना उजाळा मीळावा म्हणून स्मारकांची निर्मिती केली.आज हे स्मारक बहुजन महापुरुषांच्या त्यागाचा व त्यांच्या विचारांचा इतिहास सांगत आहेत. असे प्रतिपादन बसपाचे माजी महाराष्ट्र प्रदेश महासचिव प्रशांत वासनिक यांनी केले.

याप्रसंगी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश माननीय भूषणजी गवई साहेब यांचा मनुवादी मानसिकतेच्या व्यक्तीने केलेल्या अपमानाचा जाहीर निषेध करण्यात आला.

आज दि.९ ऑक्टोबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी मान्यवर कांशीरामजी साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला मा.प्रा.वसंत ओगले सर,मा.अण्णासाहेब शेळके सर,मा.जी एम भोले,मा.डी जी वानखेडे.मा.अरुण वाघमारे, मा.भास्कर पिंपरीकर,मा.सागर अवसरमल,मा.एड.दीपक तांगडे,मा.एड. तेजस वडमारे,मा.एन एम वाठोरे,मा.कॅप्टन राजाभाऊ आठवले,मा.राजू झाडे,मा.जवंजाळ सर,मा.राजू मस्के,मा.कल्याण वाव्हळ,मा.रमेश काकडे,मा.कुंडलिक सोनवणे सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## पं.रमाकांत गायकवाड यांच्या संगीत संध्येत रसिक मंत्रमुग्ध

बीड /प्रतिनिधी

एन.एस.सी. म्युझिक अकॅडमी, सहयोग नगर,बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या संगीत संध्या या सांगीतिक कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमात प्रख्यात गायक पं. रमाकांत गायकवाड यांच्या सुरेल गायनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले, तर सुप्रसिद्ध तबलावादक विश्वनाथ बेहेरे यांच्या तबला सोलो वादनाने वातावरण भारावून टाकले.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने दीपप्रज्वलनाने झाली. पं.रमाकांत गायकवाड यांनी आपल्या गायनातून भारतीय शास्त्रीय संगीताची समृद्ध परंपरा रसिकांसमोर खुली केली. त्यांनी रागदारी आणि ठुमरी सादरीकरणात सखोलता व




सुसंवाद दाखवत संगीताच्या उंचीला नेले. त्यांच्या गायनाला कौस्तुभ तळेकर यांची तबल्यावर साथ लाभली, तर गणेश जगदाळे यांनी उत्तम हार्मोनियम साथ देत गायनाची रंगत वाढवली. यानंतर झालेल्या तबला सोलो सादरीकरणात विश्वनाथ बेहेरे यांनी आपल्या वादनकलेने प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांची लयकारी, विविध कायदे आणि परंपरेतील बंदिशींची ओघवती मांडणी यांनी कार्यक्रमात विशेष रंग भरले. त्यांना लहरा साथ अमेय बेहरे यांनी केली. एन.एस.सी. म्युझिक अकॅडमीतर्फे आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश गुणवत्तापूर्ण भारतीय शास्त्रीय संगीत रसिकांपर्यंत पोहोचवणे हा होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल एन.एस.सी. म्युझिक अकॅडमीच्या वतीने नरहरी दळे, सुग्रीव महाराज डाके श्री सचिनजी मार्गे यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि पुढील कार्यक्रमासाठी ही असाच प्रतिसाद द्यावा असे आवाहन केले.

# संपकाळातील सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरण सज्ज

### सात वीज कर्मचारी संघटनांचा संप बेकायदेशीर; 'मेस्मा'लागू

मुंबई, प्रतिनिधी

महावितरणमधील सात वीज कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीने ९ ते ११ ऑक्टोबरपर्यंत संप पुकारला आहे. या तीन दिवसीय संपाच्या कालावधीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून आपत्कालिन नियोजन पूर्ण झाले असून राज्यभरातील यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. तसेच गंभीर कारणास्तव घेतलेल्या रजा वगळून सर्व अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द करण्यात आल्या आहेत. रजेवरील कर्मचाऱ्यांना तातडीने कामावर रूजू होण्याची सूचना देण्यात आली आहे.

व्यवस्थापनाकडून वारंवार सकारात्मक चर्चा व आवाहन करूनही संयुक्त कृती समितीने संपाचा निर्णय कायम ठेवला आहे. वीज ही अत्यावश्यक सेवा असल्याने नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम (मेस्मा) लागू करण्यात आल्याने हा संप बेकायदेशीर ठरला आहे.संपकाळात नागरिकांनी वीजपुरवठ्याबाबत कोणत्याही नकारात्मक व चुकीच्या संदेशावर विश्वास ठेवू नये. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी यंत्रणा युद्धपातळीवर रात्रंदिवस सज्ज राहणार आहे. वीजपुरवठ्याबाबत काही तक्रारी किंवा शंका असल्यास २४ तास सुरु असलेल्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा व संपाच्या कालावधीत सहकार्य करावे असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

# माजलगाव नगरपालिकेचे आरक्षण सोडत जाहीर २६ नगरसेवक पदासाठी आपले कसब पणाला लावणार

माजलगाव(प्रतिनिधी)माजलगाव नगरपालीकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी २६ सदस्यपदांची आरक्षण सोडत निवडनुक अधिकारी तहसीलदार संतोष रूईकर यांच्या अध्यक्षतेखाली नगरपरिषदेच्या सभागृहात काढण्यात आली.या सोडतीमुळे निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले असून,अनेक इच्छुकांना संधी मिळाली आहे तर काहींना आरक्षित जागेमुळे फटका बसला आहे.

यावेळी मुख्याधिकारी पोपट निगळ यांची प्रमुख उपस्थिती होती.नगरपरिषदेच्या एकूण ४९,४५३ लोकसंख्येनुसार १३ प्रभागांमधून २६ नगरसेवक निवडले जाणार आहेत.यामध्ये अनुसूचित जातीसाठी ३ जागा(राखीव २महिला), नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी (ओबीसी)७जागा(राखीव ४ महिला)आणि एकूण १३ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

प्रभाग क्र.१(अ)नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला,(ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र.२(अ) अनुसूचित जाती महिला,(ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र.३(अ) नागरिकांचा मागास प्रवर्ग,(ब)सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र.४(अ)नागरिकांचा मागास प्रवर्ग,(ब)सर्वसाधारण महिला,प्रभाग क्र.५ (अ) सर्वसाधारण महिला,(ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र.६(अ)सर्वसाधारण महिला,(ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र.७(अ)नामाप्र महिला,(ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र.८(अ) नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला,(ब)सर्वसाधारण, प्रभाग क्र.९(अ)नागरिकांचा मागास प्रवर्ग,(ब)सर्वसाधारण महिला,प्रभाग क्र.१०(अ) सर्वसाधारण महिला(ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र.११(अ) नामाप्र महिला,(ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र.१२ (अ)अनुसूचित जाती महिला,(ब) सर्वसाधारण,प्रभाग क्र.१३ (अ)अनुसूचित जाती,(ब) सर्वसाधारण महिला याप्रमाणे माजलगाव नगरपालिकेचे आरक्षण सोडत जाहीर झाले आहे.भावी नगरसेवक आपले कसब पणाला लावत हे पद हासील करणेसाठी प्रयत्न करतील.या निवडणुकीत ओबीसी साठी नगराध्यक्ष पद जाहीर झाले असून त्याप्रमाणे ही निवडणूक रंगीत होईल, असे राजकीय चर्चा चालु आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# धोबी-परीट समाजाला पूर्ववत अनुसूचित जातीत समाविष्ट करण्याची मागणी

बीड (प्रतिनिधी)

धोबी-परीट समाजाला पूर्ववत अनुसूचित जाती प्रवर्गाचे आरक्षण मिळावे या प्रमुख मागणीसाठी बीड जिल्हा धोबी-परीट समाजाने दिनांक ०९/१०/२०२५ गुरुवार रोजी जिल्हाधिकारी बीड यांच्या हस्ते मा. मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले. हे निवेदन दादासाहेब नन्नवरे यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आले.या मागणीच्या समर्थनार्थ समाजाच्या शिष्टमंडळाने महत्त्वाचे ऐतिहासिक आणि संवैधानिक पुरावे सादर केले.प्रमुख मागणी आणि ऐतिहासिक संदर्भ समाजाने निवेदनात म्हटले आहे की, १९६० पूर्वी (महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या आधी) धोबी-परीट समाज सी.पी. अँड बेरार राज्यामध्ये बुलढाणा व भंडारा जिल्ह्यांमध्ये राज्य आणि केंद्र सरकारच्या गॅझेटमध्ये अनुसूचित जातीत समाविष्ट होता, हे पुराव्यानिशी सिद्ध झाले आहे.



मात्र, १९६० मध्ये महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर या समाजाला इतर मागासवर्गीय (जइउ) प्रवर्गात टाकण्यात आले. विशेष म्हणजे, हा बदल करताना शासनाकडे कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नाही, हे तत्कालीन समाजकल्याण मंत्र्यांनी मान्य केल्याचेही निवेदनात नमूद आहे.

१९७६ च्या घटनादुरुस्तीचा आधार

समाजाची ही कोणतीही 'नवीन' मागणी नसून, 'पूर्ववत अनुसूचित जातीत समाविष्ट' करण्याची आहे. त्यांनी १९७६ च्या घटनादुरुस्तीचा संदर्भ दिला आहे, ज्यानुसार 'क्षेत्रबंधन' हटविल्यामुळे एका जिल्ह्याला मिळत असलेली सवलत संपूर्ण राज्याला लागू होते.

जर समाज आज भंडारा किंवा बुलढाणा जिल्ह्यांमध्ये असता, तर संपूर्ण राज्यात तो अनुसूचित जातीत राहिला असता. शासनाने ही चूक त्याच वेळी दुरुस्त करायला हवी होती, त्यामुळे समाजावर मोठा अन्याय झाल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

समितींचे अहवाल आणि मुख्यमंत्र्यांची शिफारस

महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या डॉ. भांडे समिती, टाटा संशोधन समिती, अनुसूचित जाती-जमाती आयोग, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन समिती (इ-ठढख) या सर्व संस्थांनी धोबी-परीट समाज सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेला असून, तो अस्पृश्यतेचे निकष पूर्ण करतो, असा स्पष्ट अहवाल दिला आहे. या सर्व संस्थांनी धोबी समाजाला अनुसूचित जातीत समाविष्ट करण्याची स्पष्ट शिफारस केली आहे.

या शिफारशींच्या आधारावरच, महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी २०१९ मध्ये महाराष्ट्र शासनाकडून केंद्र शासनाला धोबी समाजाचा अनुसूचित जातीत समावेश करण्याची स्पष्ट शिफारस केली आहे.

तातडीची मागणी

या केंद्र शासनाच्या पाठपुराव्यासोबतच, महाराष्ट्र शासनाने १९६० चे पुरावे आणि डॉ. भांडे समितीच्या शिफारशी विचारात घेऊन, सर्वप्रथम भंडारा व बुलढाणा जिल्ह्यात पूर्ववत समाविष्ट करावे, जेणेकरून १९७६ च्या घटनादुरुस्तीनुसार संपूर्ण राज्यातील धोबी समाज आपोआप अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट होईल, अशी तातडीची मागणी बीड जिल्हा धोबी-परीट समाजाने केली आहे.

उपस्थिती

यावेळी बालाजी पवार, प्रधान पवार, मोहन राऊत, शंकर व्यवहारे, गणेश नन्नवरे, कान्हा मुळे, सतिष मुळे, बाबू भालेकर, महादेव नन्नवरे, विक्रम वाघमारे, श्रीकांत जाधव, मुळे मामा, दत्ता जाधव, आकाश जाधव, शहादेव नन्नवरे, विलास जाधव, अर्जून काळे, नारायण काळे, परमेश्वर राऊत, आदित्य रोकडे, दत्ता नन्नवरे, सोमनाथ नन्नवरे, रामेश्वर काळे, पमा काळे, कचरु राऊत, शैलेश मुळे, रदिप वाघमारे, नितीन नन्नवरे, ज्ञानेश्वर राऊत, राजेंद्र मोताळे, किरण राऊत, अमोल पवार, बंडू राऊत, राऊत पाहुणे इत्यादी समाज बांधवांनी उपस्थित राहून निवेदनावर सह्या केल्या.

# प्रभु रामचंद्र विद्यालयाच्या दोन विद्यार्थिनींची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

आष्टी (प्रतिनिधी)

छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय कुस्ती स्पर्धा पार पडल्या. यामध्ये विद्यालयाच्या तीन विद्यार्थिनींपैकी दोन विद्यार्थिनींची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. यामध्ये कु. काळे काजल यमाजी ५४ किलो वजन गट, कु. वाघुले विद्या सचिन ५८ किलो वजन गट या विद्यार्थिनींनी विजय मिळवून राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली असून कु. पोटे समृद्धी संतोष या विद्यार्थिनीने विभागीय कुस्ती स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळवला आहे.



विद्यार्थिनींच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. आमदार भीमरावजी धोंडे साहेब, युवा नेते अजय दादा धोंडे, अभय राजे धोंडे, प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत सर, प्रा. शिवदास विधाते सर, माऊली बोडखे सर, संजय शेंडे सर, प्रा. नन्नवरे सर प्रा. वाघुले सर, विद्यालयाचे मुख्याध्यापक राजाराम नरुटे सर, क्रीडा शिक्षक सुरेशकुमार दिंडे सर, शिवाजीराव कोल्हे सर सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, सरपंच भाऊसाहेब कोकरे, उपसरपंच भरत आप्पा विधाते, सर्व ग्रामपंचायत सदस्य दादेगाव, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन सुरेश आण्णा गर्जे, व्हॉइस चेअरमन भुजंग आण्णा विधाते, यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



# प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तंत्र प्रशाला केंद्रात रोजगारक्षम अल्पकालीन अभ्यासक्रमाचे उद्घाटन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, अंबाजोगाई येथे अल्पकालीन रोजगारक्षम कार्यक्रमाचे उद्घाटन बुधवार, दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता देशाचे सन्माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते आभासी पद्धतीने (डिजिटल माध्यम) करण्यात आले. त्या अनुषंगाने औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई येथे सहा अल्पकालीन अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री महोदय मंगल प्रभातजी लोढा यांचे संकल्पनेतून ही योजना राबविण्यात येत आहे.

या उद्घाटन कार्यक्रमास राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई येथील उद्घाटन विश्वकर्मा लाभार्थी महादेव क्षीरसागर यांच्या हस्ते क्लास रूमचे उद्घाटन करून करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती अश्विनी जिरंगे-सोनवणे, नायब तहसिलदार श्रीमती स्मिता बाहेती, बिडीओ एस.एल.कांदे, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी उद्धव कोल्हेवाड, कार्यक्रमाचे अध्यक्ष आयएमसी सदस्य विमलकर देशपांडे हे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी संस्थेचे प्राचार्य पि.टी.मुने यांच्या मार्गदर्शनानुसार श्रीमती एस.ए.क्षीरसागर (गट निदेशिका), मुख्य लिपिक आर.सी.धस, बि.आर.म्हेत्रे, भंडारपाल अभय पोटपल्लेवार, निलेश म्हातारमारे, व्हि.पी.साबळे, सौ.भाग्यश्री पाटील, श्रीमती मांडगे रोहीणी, बि.एस.बरगे, एस.जी.गित्ते, जि.पी.चाटे, जि.ए.वेदे, सोमेश्वर पुजारी, सि.टी.भोसले, डि.एस.दहीफळे, एम.बी.शेख यांनी पुढाकार घेतला. यावेळी सर्व कर्मचारीवृंद व मान्यवर यांच्यासह प्रशिक्षणार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमंत ओव्हाळ यांनी केले, तर सूत्रसंचालन रफिक शेख यांनी करून उपस्थितांचे आभार नितेश बडे यांनी मानले. या संस्थेत आज शुक्रवार, दिनांक १० ऑक्टोबर पासून १) असिस्टंट ब्युटी थेरपी, २) सोलार टेक्निशियन, ३) फिल्ड टेक्निशियन (एअर कंडिशनर), ४) बॅटरी सिस्टीम रिपेअरिंग टेक्निशियन, ५) टू व्हीलर सर्व्हिसिंग टेक्निशियन आणि ६) शिवण मशीन ऑपरेटर हे सहा अल्पकालीन अभ्यासक्रम सुरू होत आहेत. या व्यावसायिक अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रवेश घ्यावा, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य पि.टी.मुने यांनी केले.



# माझ्या काशिनाथचा सांभाळ करा.सांगवी पाटणच्या गुरुकुलात एक नवा महंत अवतरला - डॉ. न्यायाचार्य नामदेव शास्त्री महाराज

आष्टी ( प्रतिनिधी)

दि. ०८ ऑक्टोबर २०२५ श्री महंतकाशिनाथ महाराज शास्त्री यांचा २१ वा महंत स्थापना समारोह आज सांगवी पाटण येथे सोहळ्याच्या वातावरणात संपन्न झाला. श्री क्षेत्र भगवानगड गड संस्थान येथील महंत काशिनाथ महाराज शास्त्री विद्यार्थी आहेत.

हा ऐतिहासिक कार्यक्रम सकाळी ९ ते ११ या वेळेत श्री ह. भ. प. गुरुवर्यवैराग्यमूर्ती महंत सुदर्शनजी महाराज (मठाधीपती, सुदर्शन संस्थान सांगवी पाटण) आणि श्री. ह. भ. प. गुरुवर्य न्यायाचार्य महंत डॉ. नामदेव महाराज शास्त्री (श्री क्षेत्र भगवानगड) यांच्या पावन सान्निध्यात आणि शुभहस्ते पार पडला.सांगवी पाटण येथे पहिल्या १९ महंत यांच्या समाधी आहे. २० वे महंत सुदर्शन महाराज आहेत तर २१ वे महंत म्हणून काशिनाथ महाराज शास्त्री यांची नियुक्ती झाली आहे. कार्यक्रमात एक भव्य आणि दिव्य मिरवणूक काढण्यात आली, ज्यामध्ये सांगवी पाटण गावातील तसेच संपूर्ण पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी उत्साहात सहभाग घेतला. सुवर्ण महोत्सव अखंड हरिनाम सप्ताहाची कीर्तन सेवा सपन्न.या समारंभाच्या निमित्ताने चालू असलेल्या सुवर्ण महोत्सव अखंड हरिनाम सप्ताहातील सातव्या दिवशी डॉ. न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांची जाहीर हरी कीर्तन सेवा रात्री ७ ते ९ या वेळेत संपन्न झाली. या आध्यात्मिक कार्यक्रमात देखील पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून धार्मिक भावनेने हरीनामाचा आनंद घेतला. संपूर्ण कार्यक्रम यशस्वीपणे आणि शांततापूर्ण पद्धतीने संपल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

# स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात सेबी द्वारे आर्थिक साक्षरता कार्यशाळेचे आयोजन



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयातील वाणिज्य , अर्थशास्त्र विभाग व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने सेबी (भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड)च्या माध्यमातून आर्थिक साक्षरता,इनव्हेस्टर अवेअरनेस प्रोग्राम कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत सेबी ट्रेनर जी.बी. चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पी. पी. टी. द्वारे त्यांनी आपल्या विषयाची मांडणी केली. त्यांनी बचतीचे महत्त्व अधोरेखित केले. आर्थिक व्यवहार करताना सावधानता बाळगणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांनी आर्थिक नियोजन कसे करावे या बद्दल त्यांनी माहिती दिली . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . प्रशांत देशमुख यांनी भूषविले. त्यांनी विद्यार्थ्यांना अकरावीपासूनच दर महिन्याला शंभर रुपयाची बचत करावी , अनावश्यक खर्च टाळावा, स्वतःचा विमा काढून घ्यावा अशा प्रकारचे अतिशय बहुमोल असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.निलेश होदलूरकर यांनी केले तर आभार डॉ. ममता राठी मॅडम यांनी मानले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# सुदामा कृष्ण भेटीने भागवत कथेचा झाला समारोप

आज होणार शिवाजीराव पंडित यांचा अभिष्टचिंतन सोहळा

गेवराई ( प्रतिनिधी)

माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित भागवत कथेचा समारोप कृष्ण सुदामा च्या भेटीने करण्यात आला. यावेळी भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या सुश्राव्य वाणीतून भागवत कथेची सांगता केली. यावेळी त्यांनी सुदामा कृष्ण भेट कथन केली त्यावेळेस उपस्थितांच्या डोळ्यात अश्रू उभा राहिले. याप्रसंगी माजी मंत्री शिवाजीराव पंडित, आ. विजयसिंह पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित यांच्यासहहभाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त समाधान समाधान महाराज शर्मा यांच्या भागवत कथेचा समारोप झाला. यावेळी गेवराई शहरासह ग्रामीण भागातून भाविक भक्तांनी प्रचंड गर्दी केली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिष्टचिंतन सोहळा समितीने परिश्रम घेतले.






# फार्मसी महाविद्यालयात एड्स/ एच.आय.व्ही विषयक जनजागृती शिबिर संपन्न

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी. फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने एच.आय.व्ही/एड्स विषयक जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. हे शिबिर आयोजित करण्यातचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये एच.आय.व्ही./एड्सविषयी जनजागृती , वैज्ञानिक माहिती, सामाजिक संवेदनशीलता आणि प्रतिबंधात्मक उपायांची जाणीव निर्माण करणे हे होते. या शिबिराचे उद्घाटन फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके , प्रदीप जिरे (समुपदेशक , खउढउ), विश्वास लवंदे यांच्या उपस्थिती मध्ये तथा अध्यक्षतेखाली झाले.

यावेळी आपल्या प्रास्ताविक पर मार्गदर्शनात प्राचार्य तरके यांनी समाजातील गैरसमज दूर करून एच.आय.व्ही./एड्सबाबत जागरूकता वाढविण्याचे महत्त्व सांगितले.प्रमुख वक्ते प्रदीप जिरे (समुपदेशक, खउढउ) आणि विश्वस लवंद (प्रयोगशाळा तंत्रज्ञ) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. लवंद यांनी प्रयोगशाळा तपासणी, रक्तनमुने हाताळताना घ्यावयाची काळजी आणि सुरक्षा व नियमांचे निराकरण केले. तर जिरे यांनी एच.आय.व्ही./ एड्सचे लक्षणे, संसर्गाचे मार्ग, प्रतिबंधात्मक उपाय आणि समाजातील कलंक नष्ट करण्याची गरज स्पष्ट केली.

शिबिरातील प्रश्नोत्तर सत्रात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला . या दरम्यान विद्यार्थ्यांनी आपापले गैरसमज दूर केले. शेवटी प्रा. मंदार चौधरी, कार्यक्रम अधिकारी यांनी उपस्थितांचे आभार मानले व युवकांना आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण्याचे आवाहन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारी, सहानुभूती आणि आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाल्याचे दिसून आले. असेच आरोग्य विषयक शिबिरे वारंवार आयोजित करण्याची भावना निर्माण झाली होती.

# सरन्यायाधीश भूषण गवईंवर हल्ला करणाऱ्या देशद्रोही राकेश किशोरला परळीकरांनी जोडे मारुन केला निषेध

## संविधान प्रेमी नागरिक व सर्वपक्षीय नेत्यांचा निदर्शनात सहभाग

परळी (प्रतिनिधी)

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर बूट फेक करणाऱ्या देशद्रोही वकील राकेश किशोरच्या प्रतिमेस परळीकरांनी मुख्य चौकात जोडे मारून त्याचा निषेध केला. या घटनेच्या निषेधार्थ परळी शहरात दिनांक ९ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या निदर्शनात शहरातील संविधान प्रेमी व सर्वपक्षीय नेते आणि कार्यकर्त्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.



भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश बी .आर.गवई यांच्यावर सनातनी वृत्तीच्या हल्लेखोर राकेश किशोर या वकिलाने सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू असताना बुट फेकून मारण्याचा प्रयत्न केला. त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा व त्याला केंद्र सरकारने अटक करावी या मागणीसाठी आज दिनांक ९ ऑक्टोबर रोजी राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक येथे सकाळी ११ वाजता तमाम संविधान प्रेमी नागरिकांकडून तीव्र निदर्शने करण्यात आली. तसेच राकेश किशोरच्या प्रतिमेस उपस्थित संविधान प्रेमी नागरिक व सर्वपक्षीय नेते आणि कार्यकर्त्यांनी जोडे मारून त्याचा तीव्र निषेध केला. विविध राजकीय पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते यांनी आपल्या तीव्र भावना यावेळी व्यक्त केल्या.

या निदर्शनात शहरातील नागरिक मोठ्या संख्येने राणी लक्ष्मीबाई टॉवर येथे उपस्थित होते. हातामध्ये भारतीय तिरंगा ध्वज घेऊन भारतीय संविधानाचा विजय असो, हल्लेखोर राकेश किशोर याच्यावर कठोर कारवाई करावी , देश द्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशा प्रकारच्या घोषणा यावेळी देण्यात आल्या. निदर्शने झाल्यानंतर राष्ट्रपतींच्या नावे परळीच्या तहसीलदारा मार्फत निवेदन देण्यात आले.

# कबड्डी हा महाराष्ट्राच्या मातीतला रांगडा खेळ-दिपक आतकरे

## शिवाजीराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हा कबड्डी निवड चाचणी स्पर्धेचे शानदार उदघाटन

गेवराई ( प्रतिनिधी)

कब्बडी हा महाराष्ट्राच्या मातीतला रांगडा खेळ आहे, तो आजच्या युवकांनी जोपासला पाहिजे. कबड्डी हा खेळ आपल्याला जय पराजय पचवायला शिकवतो. त्यामुळे युवकांनी खेळाकडे वळावे असे आवाहन केले. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष दिपक आतकरे यांनी केले. गेवराई येथे शिक्षणमहर्षी शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा कबड्डी असोशिएशन व शारदा स्पोर्ट्स कडमी गेवराई आयोजित आयोजित जिल्हा कबड्डी निवड चाचणी स्पर्धेचे उद्घाटन करताना ते बोलत होते.

शिक्षणमहर्षी शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा कबड्डी असोशिएशन व शारदा स्पोर्ट्स कडमी गेवराई आयोजित आयोजित जिल्हा कबड्डी निवड चाचणी स्पर्धेचा शुभारंभ झाला. यावेळी दादासाहेब घोडके, विनोद सौदंरमल, भाष्करराव काकडे, राष्ट्रीय खेळाडू गोपाळ मोटे, सतिश प्रधान, दादासाहेब चौधरी, जिजा पंडित, लहू पवार, बीड जिल्हा कबड्डी असोशिएशनचे



कार्यवाह प्राचार्य डॉ.विश्वास कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी प्रस्ताविक केले. या निवडचाचणी स्पर्धेसाठी जिल्हा भरातुन किशोर गटातुन १६, किशोरी ६ ,कुमारी ६,ओपन महिला गटाचे २ अशा एकुण ३० संघाने सहभाग नोदंवला गेला. उदघाटक व प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडून मैदान पुजन केले व उदघाटनपर सामना खेळवला गेला. निवड समिती तज्ञ व पंच म्हणुन प्रा.ब्रम्हनाथ मेंगडे, प्रा.कैलास जगदाळे, प्रा.प्रविण शिलेदार. प्रा.सानप, प्रा.वनगुजरे आदिनी काम पाहिले. याप्रसंगी नितीन गर्जे, श्रीराम इंगळे , सुरेश चौधरी, श्रीमती सुनिता शिंदे यांच्यासह क्रिडाप्रेमी नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केले तर उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार प्रा. डॉ. वंदन जाधव यांनी मानले. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा.कलदंर पठाण, प्रा.केशव सुर्वे, मधुकर धुताडमल यांनी अथक परिश्रम घेतले.

कब्बडी हा महाराष्ट्राच्या मातीतला रांगडा खेळ आहे, तो आजच्या युवकांनी जोपासला पाहिजे.




## शास्त्री विद्यालयात संघाचे प्रचार विभागाचे प्रांत कार्यकर्ते व्यंकट दादा दशरथ यांचे पंच परिवर्तन याविषयावर व्याख्यान

उदगीर ( प्रतिनिधी)

लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात पंच परिवर्तन याविषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुणे विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर पर्यवेक्षक कृष्णा मारावार ,किरण नेमट माधव मठवाले उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून संजय कुलकर्णी यांनी पंच परिवर्तनातून माणसांमध्ये इष्ट बदल होतो व राष्ट्राचा विकास होतो हा बदल कसा करावा याविषयी विचार मांडले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते व्यंकट दादा दशरथ यांनी संघशताब्दी निमित्त पंच परिवर्तनातून राष्ट्र परम वैभवाला नेऊया समरसता, कुटुंब प्रबोधन ,स्वबोध, पर्यावरण व नागरी कर्तव्य याविषयीची माहिती साध्या सोप्या शब्दात सांगितली. संघ आणि समाज वेगळा नाही गावोगावी हिंदू मेळावे व गृह संपर्क अभियान सुरू करण्यात यावे सर्वांनी एकत्र येऊन राष्ट्रासाठी कार्य करावे. असे विचार आपल्या वक्तव्यातून मांडले .याप्रसंगी संघ प्रचार विभागाचे प्रांत कार्यकर्ते शिवरुद्र विश्वनाथप्पा धाराशिवे, ज्ञानेश्वरप्पा हुरदळे, रमाकांतजी देशपांडे, चंद्रकांत मौबदे ,विजय कदम, धोंडीराम निलंगेकर ,योगेशजी हुरदळे यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रद्धा पाटील प्रास्ताविक मुख्याध्यापक संजय कुलकर्णी सांघिक गीत मंजुषा रुद्रवार वैयक्तिक गीत प्रीती शेंडे तर कार्यक्रमाचे आभार उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अनिता येलमटे कार्यक्रम प्रमुख कृष्णा मारावार यांसहित सर्वांनी परिश्रम घेतले.किरण नेमट यांच्या कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मागणी एक-मदत दुसरीच-किसान सभा

## कर्जमाफीसह इतर मागण्याकरिता किसान सभेचे निदर्शने

बीड / प्रतिनिधी

निसर्गाचा लहरीपणा, सरकारचे शेती विरोधी आयात-निर्यात धोरण आणि शेतमालाला न मिळालेल्या हमीभाव या तिहेरी संकटात सापडलेल्या बळीराजावर यंदाच्या खरिपात होत्याच नव्हतं करून ठेवलं आहे. नैतिक जवाबदारी असलेल्या सरकारने पोकळ आकड्यांचा खेळ करत मदतीची वलग्ना करत शेतकऱ्यांचा भ्रमनिरास केला असून शेतकऱ्यांची मागणी वेगळीच असताना मदत मात्र वेगळी केल्याने शेतकरी पुन्हा एकदा आपल्या मागण्याकरिता आज शुक्रवार दि १० रोजी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या तहसील कार्यालयावर निदर्शने करणार असल्याची माहिती बीड किसान सभेने दिली आहे.यंदाच्या खरिपात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच प्रचंड नुकसान झाले असून निवडणूक पूर्वी सत्तेत येण्यापूर्वी केलेली कर्ज माफीचे आश्वासन पूर्ण करण्याची ही रास्त वेळ असताना सत्ताधारी केवळ आकड्यांचा खेळ करत शेतकऱ्यांच्या हाती भोपळा देण्याचा प्रकार सुरू आहे.पंजाब, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यात यावेळीच्या अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना ज्या पद्धतीने मदत करण्यात आली त्याच प्रमाणे राज्यातील सरकारने शेतकऱ्यांना मदत करून आपले उत्तरदायित्व निभवावे. संपूर्ण कर्ज माफी करत एक्करी ५० हजार रु मदत, शेतमजुरांच्या हाताला काम नसल्याने त्यांना श्रमनुकसान भरपाई म्हणून ३० हजार रु प्रतिमाह, पीक विमा तात्काळ मंजूर करावा, खरवडून गेलेल्या शेतीचा संपूर्ण पंचनामा करत नुकसान भरपाई देण्यात यावी या मागण्याला घेत बीड जिल्हा किसान सभा, सिटू कामगार संघटना व शेत मजूर युनियन यांचे संयुक्तरित्या आज शुक्रवार दि १० रोजी जिल्ह्यातील प्रत्येक तहसील कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा किसान सभेकडून देण्यात आली आहे.

या मागण्यांसाठी आंदोलन

शेतकऱ्यांना प्रति एकर ५० हजार रुपये पीक नुकसान भरपाई द्या, शेतमजुरांना श्रम नुकसान भरपाई म्हणून ३० हजार रुपये द्या, शेतकऱ्यांचे व शेतमजुरांचे संपूर्ण कर्ज माफ करा, कर्जमाफी योजनेत पीक व शेती कर्जा बरोबरच बचत गट, सावकारी व मायक्रो फायनान्स कर्जाचाही समावेश करा, विद्यार्थ्यांची फी माफ करा, पीक विम्याचे काढून टाकलेले ट्रिगर पुन्हा लागू करा, शेती, जनावरे, घरे, गोठे यांचे झालेले नुकसान सरकारी खर्चाने रोजगार हमी योजनेतून कामे काढत भरून द्या

# आता शेतक-याचे सोलर सुध्दा सुरक्षीत नाही !

## चोराच्या रडारवर सोलर पंप !

मानूर ( प्रतिनिधी)

शिरूर कासार तालुक्यातील शेतक-यांचे अतिवृष्टी आणि महापुराने कंबरडे मोडले ,पिकाची नासाडी झाली ,वाहून गेले ,भिजले ,कुजले येव्हडे शुक्लकाष्ट कमी की काय म्हणून आता शेतकऱ्यांचे सोलर पंप देखील सुरक्षीत नसल्याचे दिसून येत आहे ,चोराच्या रडारवर सोलर पंप असल्याचे मंगळवारी रात्री पंपाचे स्टार्टर चोरीला गेल्याची घटना घडली असुन पोलीसात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला .

विजेच्या लपंडावाला पर्याय म्हणून शेतकरी सोलर पंपाला पसंती देऊ लागला त्यात सरकारकडून मागेल त्याला सौर उर्जा पंप अनुदानावर देत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी आपल्या बोअर ,विहीरीवर सोलर पंप बसवले मात्र आता चोरानी हे पंप लक्ष केले .

भाऊसाहेब पवार ,भागवत पवार आणि नंदू शेळके या तीन शेतकऱ्यांचे अंदाजे ४३ हजार किमतीचे पंप स्टार्टर चोरीला गेले असुन पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला .महागडे स्टार्टर चोरीला गेले सध्या जरी पंप चालू करण्याची गरज नसली तरी अवघ्या आठ दहा दिवसात पंप सुरू करावे लागतील मात्र स्टार्टरच चोरीला गेल्याने पंप कसा सुरू करणार असे भाऊसाहेब पवार यांनी सांगितले.नंदू नारायण शेळके यांचे फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला पुढील अधिकचा तपास स.पो.नि.प्रविण जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस जमादार राहूल नागरे हे करत आहेत .

## सहा गरीब रुग्णांचे आधार बनले सुरेश धस

पाटोदा (प्रतिनिधी)

आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांनी पुन्हा एकदा आपल्या कार्यतत्परतेचा आणि संवेदनशीलतेचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या पुढाकारातून आणि प्रयत्नातून मागील चार दिवसांत सहा गोरगरीब आणि गरजू रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून आर्थिक मदत मिळाली असून, या मदतीमुळे अनेक कुटुंबांना नवजीवन मिळाले आहे. आमदार धस यांची वैद्यकीय मदत यंत्रणा सध्या संपूर्ण जिल्ह्यात वेगाने आणि प्रभावीपणे कार्यरत असून, मतदारसंघापुरती मर्यादित न राहता इतर जिल्ह्यांतील रुग्णांनाही तिचा लाभ मिळत आहे.

जामगाव येथील वैष्णवी राजेंद्र धस या बालिकेला आजाराने त्रस्त झाल्यानंतर सिद्धिविनायक हॉस्पिटल, नगर येथे दाखल करण्यात आले होते. घरची चारस्थित दाखल करण्यात आले होस याची तातडीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे पाठपुरावा करून एकाच दिवशी पन्नास हजार रुपयांची मदत मंजूर करून घेतली. दौंड तालुक्यातील मजुर काकासाहेब शामराव पवार मेंदूच्या आजाराने ग्रस्त असल्याने त्यांनाही दोन दिवसांतच एक लाख रुपयांची मदत मिळाली. कानडी बुद्रुक येथील दत्तात्रय शहाजी खिळे यांना अचानक मेंदूविकाराचा झटका आल्याने साई साईन हॉस्पिटल, अहमदनगर येथे उपचार सुरू असून, आमदार धस यांच्या प्रयत्नांतून त्यांनाही मुख्यमंत्री निधीतून एक लाख रुपयांची मदत मंजूर झाली. पाटण सांगवी येथील द्वारकाबाई महादेव यादव या मेंदूच्या आजाराने त्रस्त असून, न्यूरोप्लस हॉस्पिटल, अहमदनगर येथे उपचार घेत आहेत;

त्यांनाही केवळ दोन दिवसांत पन्नास हजार रुपयांची मदत मिळाली. तसेच नगर येथील जयदीप अशोक चखाले यांनाही आमदार धस यांच्या पुढाकारातून मदत मिळाली असून त्यांच्यावरही उपचार सुरू आहेत. याशिवाय बीड जिल्ह्यातील माधवराव पंडित यांनाही आमदार धस यांच्या पत्रामुळे पस्तीस हजार रुपयांची मदत प्राप्त झाली आहे. या सर्व प्रक्रियेसाठी आमदार धस यांचे सहाय्यक विकास साळवे यांनी तातडीने सर्व कागदपत्रे सादर करून मदतीचा मार्ग मोकळा केला. केवळ चार दिवसांत सात रुग्णांना मदत मिळवून देणाऱ्या आमदार सुरेश धस यांच्या या तत्परतेमुळे जनतेत मोठा विश्वास आणि दिलासा निर्माण झाला आहे. त्यांच्या मानवी भावनेतून आणि कार्यशैलीतून राजकारण हे पदासाठी नव्हे तर लोकांच्या जीवासाठी असावे ही त्यांची भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# बीड शहरातील एल्गार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शेख बिलाल यांच्यासह तीन नगरसेवकांनी बांधले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिवबंधन

## बीड जिल्हा शिवसेनेला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देऊ - अंबादास दानवे
## शिवसेना वाढविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत आहे - जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली व शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत आज बीड शहरातील एल्गार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शेख बिलाल भाई व माजी नगरसेवक शेख नजीब, माजी नगरसेवक शेख मुजीबभाई , माजी नगरसेवक सय्यद फारुख यांच्यासह डॉ. शेख आसिफ शोएब , समीर शेख, फारुख सय्यद, सय्यद शफिक,शेख समीर यांनी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब यांच्या हस्ते व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिवबंधन हाती बांधून



अधिकृत प्रवेश केला.

यावेळी बिलालभाई व तिन्ही नगरसेवकांनी मनोगतात सांगितले, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे पासुन पुढे उद्धवसाहेब ठाकरे हे मुस्लिम समाजाच्या कधीच विरोधात नव्हते,हा विश्वास आम्हाला पटला आहे, त्यामुळे महाराष्ट्र राज्यात आता मुस्लिम समाज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पाठिशी उभा रहात आहे, जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनीही आपल्या मनोगतात बीड जिल्हात शिवसेना पुन्हा जोमाने उभी करण्यासाठी मी इमानेइतबारे मेहनत घेत असल्याचा विश्वास दानवे साहेबांना दिला . आपल्या मार्गदर्शनपर भाषणात अंबादास दादा दानवे म्हणाले की , शिवसेना स्थापनेपासून ते आजतागायत मुस्लिम समाजाच्या विरोधात पक्ष कधीच नव्हता,व आजही नाही,साबीरभाई शेख सारख्या निष्ठावंत शिवसैनिक मावळ्याला बाळासाहेब ठाकरे साहेबांनी या महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात स्थान देऊन मुस्लिम समाजाचा गौरव केला होता.आतातर पुर्ण परिस्थिती बदललेली आहे हा समाज आता पुर्ण ताकदीने उद्धवसाहेब यांच्या पाठीशी एकवटत आहे व आपला विश्वास दाखवत आहे.बीड शहरातील शेख बिलाल भाई व तीन नगरसेवकांनी व शेकडो मुस्लिम व हिंदू युवकांनी आज जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या माध्यमातून केलेला प्रवेश अभिनंदनीय आहे येणाऱ्या काळात बीड शहरासह जिल्हात शिवसेना वाढविण्यासाठी मी स्वतः लक्ष घालणार असून पुन्हा गतवैभव प्राप्त करण्यासाठी तुम्ही सर्वांनी मेहनत घ्यावी,

## सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यासोबत गैरवर्तन करणाऱ्या राकेश केशव नावाच्या वकिलावर कडक कार्यवाही करा आश्रूबा खरात आरपीआय (ए) तालुका अध्यक्ष

केज/प्रतिनिधी

जातीय द्वेषातून सर न्यायाधीश भूषण गवई यांच्यासोबत राकेश केशव नावाच्या वकिलाने गैरवर्तन केले त्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला आहे.भारतदेशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश श्री.भूषण गवई यांच्यावर जातीय मानसिकतेने राकेश केशव नावाचा वकील धावून गेला आणि तो पायातला बूट काढणार त्याचवेळी न्यायालयातील सुरक्षारक्षक त्याच्या दिशेने धावले व न्यायालयाबाहेर नेले त्यामुळे मोठा अनर्थ टळला सनातन का अपमान नही सहेंगा हिंदुस्तान अशा घोषणा सडलेल्या मनोवादी वकिलांनी यावेळी दिल्या होत्या,त्यामुळेरिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया



(आंबेडकर) पक्षाच्या वतीने या वकिलाचा जाहीर निषेध करून या वकिलावर कडक कार्यवाही करावी अशी मागणी दि.०९.१०.२०२५ रोजी केज तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

हे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर पक्षाचे राष्ट्रीय नेते दीपक(भाऊ) निकाळजे यांच्याआदेशाने व मराठवाडा अध्यक्ष भगवंत आप्पा वायबसे यांच्या मार्गदर्शनाखाली दिले आहे.या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर पक्षाच्या मराठवाडा महिलाअध्यक्ष आम्रपाली गजेशिव, मराठवाडा प्रवक्ते ज्ञानेश्वर गिरी,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बीड बाळासाहेब जाधव,केज तालुका अध्यक्ष आश्रुबा खरात

## तेली समाजाला नगरपालिकेत प्रतिनिधित्व देण्याची तेली समाजाची मागणी

परळी ( प्रतिनिधी)

नगरपालिकेच्या निवडणूकीचे बिगूल वाजायला सुरुवात झाली असून माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे साहेब यांनी तेली समाजाला प्रतिनिधित्व करण्याची संधी देण्याची मागणी तेली समाजातील नागरिकांनी केली आहे. यापूर्वी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली समाजाला प्रतिनिधित्व दिल्याने तेली समाजातील नगरसेवक, तसेच संस्थांवर संचालक निवडून आले होते. नगरपालिकेच्या निवडणूकीचे बिगूल वाजायला सुरुवात झाली असून नगराध्यक्षपद व नगरसेवकांचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. यामुळे ईच्छूक नगराध्यक्ष व नगरसेवक निवडणूकीच्या तयारीला लागले असून प्रभागात भेटीगाठी सुरू केल्या आहेत. शहरात तेली समाज मोठ्या संख्येने आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या नेतृत्वाखाली समाजाला विविध ठिकाणी प्रतिनिधित्व देण्यात आले होते. यावेळी नगरसेवक निवडून आले होते. तसेच वैद्यनाथ बॅंकेत स्वर्गीय गोविंद आप्पा व्यवहारे, विठ्ठल आप्पा चौधरी अनेक वर्षे संचालक, व्हाइस चेअरमन होते. गोविंद आप्पा व्यवहारे बीड जिल्हा बॅंकेवर संचालक होते. विठ्ठल आप्पा चौधरी यांना खादी ग्रामोद्योगवर संधी दिली होती. वर्षा नरेश पिंपळे या नगरसेवक म्हणून निवडून आल्या होत्या. मात्र गेल्या काही वर्षात तेली समाजाला नगरपालिकेत किंवा इतर कुठेही प्रतिनिधित्व देण्यात येत नाही. यामुळे समाजात नाराजी पसरली आहे. आता होणाऱ्या आगामी निवडणुकीत तेली समाजातील नागरिकांना नगरपालिकेत प्रतिनिधित्व देण्यात यावे. तेली समाजाबद्दल स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, जितके साथ तेली वो भाग्यशाली या उक्तीने समाजाला प्रतिनिधित्व देण्यात यावे अशी मागणी समाजाकडून महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, सचिव प्रा मधुकर शिंदे व समाजातील नागरिकांनी मंत्री पंकजा मुंडे व आमदार धनंजय मुंडे

# शरीराचा चांगला उपयोग, मनाचे संरक्षण सांगवी पाटण येथे इंदुरीकर महाराजांचे समाजप्रबोधन

**आष्टी - (प्रतिनिधी) सांगवी पाटण येथे सुरू असलेल्या सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाच्या सहाव्या दिवशी प्रबोधनकार ह. भ. प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. दुपारच्या चार ते सहा या वेळेत झालेल्या या कीर्तनात महाराजांनी संत तुकाराम महाराज यांचा एक अभंग घेऊन भक्ती, समाजस्थिती आणि आधुनिक जीवनशैलीवर खोलवर विचार मांडले.**

प्रार्थनेची ऊर्मी (माझे चित्त तुझे पायीं ! राहे ऐसे करी काही !): महाराजांनी स्पष्ट केले की, भक्तीची सुरुवात ईश्वराकडे केलेल्या एकनिष्ठ प्रार्थनेपासून होते. जीवनातील सर्व आकांक्षा सोडून केवळ 'चित्त तुझ्या पायी राहावे' अशी विनंती हेच खरे तप आहे. भगवंताची बाहेर धरून (धरोनिया बाही) त्यानेच हा भवसागर तरायचा आहे, ही श्रद्धा पक्की झाली पाहिजे.

देवाच्या गुणांचे स्मरण (चतुर तू शिरोमणी! गुणलावण्याची खाणी!)दुस-या चरणात, भक्त आपल्या आराध्यदेवाच्या गुणांचे, लावण्याचे आणि सर्वोत्कृष्टतेचे (शिरोमणी) स्मरण करतो. विठ्ठल रूप हे सर्व दिव्य गुणांची खाण आहे आणि तोच खरा दातारा आहे, अशी भावना मनात रुजवली जाते. आध्यात्मिक प्रकाशाची गरज (करी त्रिमिराचा नाश! उद्यो होऊनी प्रकाश!): महाराज म्हणाले, आपल्या मनातील अज्ञान, मोह आणि कामक्रोधादी विकार (त्रिमिर) यांचा नाश करणारा प्रकाश म्हणजेच परमात्मा आहे. जोपर्यंत हा प्रकाश हृदयात प्रगट होत नाही, तोपर्यंत मनुष्य आशा-निराशेच्या जाळ्यात (आशापाश) अडकून राहतो.

शरणागतीचा शेवटचा टप्पा (तुका ठेवी माथा! पायी आता राखावे!!) अभंगाचा शेवट शरणागतीच्या भावनेने झाला आहे. संत तुकाराम स्पष्ट सांगतात, मी अज्ञानात नासधूस झालो आहे, आता माझी काळजी तुमच्यावर आहे. मी माथा तुमच्या चरणी ठेवला आहे, आता तुमच्याच कृपेने मला रक्षण व्हायचे आहे. ही पूर्ण समर्पणाची भावना आहे. महाराजांचे समाजाविषयीचे प्रबोधनभौतिकवादाचे मरगळ. शरीर थकले, जीवन संपले, अंगातील ताकद व खिशातला पैसा संपला की जगातून संपतो, या उद्गारातून त्यांनी सांगितले की, केवळ भौतिक साधनांवर



अवलंबून राहिल्याने जीवन निरर्थक होते. आध्यात्मिक ताकद ही खरी ताकद आहे. रागाचे घातक परिणाम - दोन मिनिटांचा राग तुम्हाला देव बनवू शकतो आणि दोन मिनिटांचा राग आयुष्य संपवितो, असे म्हणताना त्यांनी रागाच्या दुसऱ्या बाजूस (आत्मनियंत्रण) चा उल्लेख केला, पण स्पष्ट केले की अनियंत्रित राग माणसाचा नाश करू शकतो. मानसिक आरोग्यावर जोर ८० टक्के रुग्ण मनोरुग्ण आहेत. मोबाईल मुळे लोक वेडे झाले. या कठोर परंतु वास्तववादी विधानातून त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेल्या मानसिक ताण, एकांत आणि व्यसनाधीनतेकडे लक्ष वेधले. त्यांनी सुचवले की कमीपणा घ्यायची शिका, म्हणजेच साधेपणा आणि संतोषाचा अंगीकार करावा. सेवेचा महिमा सर्व महाराज मंडळी पांडुरंगाचे गडी आहेत, या ओळीतून त्यांनी सांगितले की, धर्मप्रसारक आणि संतजन हे केवळ ईश्वराचे सेवक आहेत, त्यांच्यात स्वतःचा अहंभाव नसतो.

भक्ती ही वंशपरंपरेगत नाही. परमात्मा हा रक्तात असावा लागत नाही, असे म्हणत त्यांनी भक्ती ही कोणत्याही जात, कुल किंवा वंशापेक्षा वेगळी असून ती व्यक्तिगत अनुभवावर आधारित आहे, हे स्पष्ट केले. सामूहिकता आणि आनंदाचे आवाहन शेवटी, सप्ताह म्हणजे संघटन, हसत हसत जगा व शरीराचा चांगला उपयोग करा, या संदेशातून त्यांनी सामूहिक उत्सवाचे महत्त्व, आनंदी जीवनशैली आणि निरोगी शरीरातून परमेश्वराची सेवा करण्याचा संदेश दिला. अशाप्रकारे, कीर्तनाच्या माध्यमातून प्रबोधनकार इंदोरीकर महाराजांनी श्रोत्यांना अध्यात्म आणि व्यवहार या दोन्ही क्षेत्रात मार्गदर्शन केले.

## बोधगया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात दिले पाहिजे मुंबई आझाद मैदान आंदोलना साठी केजमध्ये बैठक संपन्न

केज/प्रतिनिधी

बोधगया हे बिहार राज्या तील गयाजवळ असलेले ऐतिहासिक व धार्मिक स्थान आहे.येथेच भगवान गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती.या ठिकाणी उभारलेले महाबोधी विहार हे जगभरातील बौद्ध धर्मीयांसाठी सर्वाधिक पवित्र स्थान मानले जाते.या स्थळाला युनेस्कोने विश्व वारसा यादी मध्ये स्थान दिले आहे.मात्र,बोधगया महाबोधी मंदिराच्या व्यवस्थापनावर हिंदू पुजाऱ्यांचे नियंत्रण असल्यामुळे बौद्ध समाजात असंतोष निर्माण झाला आहे.बौद्ध धर्माचा जन्मस्थान व मुख्य केंद्र असूनही बौद्ध प्रतिनिधींना मंदिराच्या व्यवस्थापनात प्रमुख स्थान नाही,ही खंत बौद्ध बांधवांकडून व्यक्त केली जात आहे.महाबोधी सोसायटी ऑफ इंडिया ची स्थापना १८९१,साली झाली संस्थापक अनगरिका धर्मपाल यांनी या चळवळीचे नेतृत्व केले होते.पुढे १९५३ मध्ये बिहार सरकारने बोधगया मंदिर व्यवस्थापन अधिनियम लागू केला.या कायद्या नुसार ८ सदस्यीय व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली, ज्यात ४ हिंदू व ४ बौद्ध सदस्यांचा समावेश करण्यात आला परंतु अध्यक्षपद हिंदू धर्मीया कडेच राहील



असे बंधन ठेवण्यात आले.त्यामुळे बौद्ध समाजाचे असमाधान कायम आहे.

सम्राट अशोक यांनी इ.स.पू.तिसऱ्या शतकात येथे मंदिर व बोधीवृक्ष परिसराची निर्मिती केली होती.या पवित्र स्थळावर पुन्हा बौद्ध धर्मीयांचाताबा यावा,या मागणीसाठी देशभरातील बौद्ध समाज एकवटत आहे.त्याच अनुषंगाने,मुंबई येथे १४ ऑक्टोबर रोजी वार मंगळवार आझादमैदानात महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे या मागणीसाठी भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.या मोर्चासाठी शासनाने परवानगी नाकारली असली तरी लाखो बौद्ध बांधव धम्माच्या निष्ठेने या आंदोलनात सहभागी होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर केज तालुक्यातील विविध बौद्ध संघटनांची बैठक दिनांक ९ ऑक्टोबर रोजी वार गुरुवार केज येथील शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली.या बैठकीत आगामी १४ ऑक्टोबर च्या मोर्चात सकल बौद्ध समाजाचा सहभाग वाढवण्यासाठी सविस्तर चर्चा झाली.बैठकीत एक दिवस धम्मासाठी महा बौद्ध महाविहार मुक्ती साठी हा मूलमंत्र स्वीकारून सर्व बौद्ध बांधवांनी मोर्चासाठी सज्ज राहण्याचे आवाहन करण्यात आले.या वेळी केज तालुक्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वरुड बु. जि.प.साठी शिवसेना उबाठा गटाकडून लढण्यास इच्छुक पक्षाने संधी दिल्यास शिवसेनेचा झेंडा फडकवू - रुग्णदुत विशाल पिंपळे

प्रतिनिधी : जाफराबाद हरी भालके

वरुड बु. या जिल्हा परिषद सर्कलची जागा सर्वसाधारण पदासाठी सुटलेले आहे आणि हे जिल्हा परिषद सर्कल शेती , रोड ,नाल्या, विज ,पाणी यासह विविध विकास कामापासून वंचित असून या क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आपण तत्पर असून शिवसेना उबाठा गटाने मला या जि.प.सर्कलसाठी उमेदवारी दिली तर जनतेच्या विश्वासावर आपण मोठ्या मताधिक्याने निवडून येऊन या जिल्हा परिषद सर्कलचा चा सर्वांगीण विकास करू असे मत सोनगिरीचे भुमिपुत्र तथा शिवसेना उबाठा गटाची ज्येष्ठ नेते अंबादास दानवे यांचे अत्यंत विश्वासू तथा रुग्ण दुत विशाल सांगितले .

९ ऑक्टोंबर गुरुवारी रोजी ते जिल्हा परिषद निवडणूक अनुषंगाने वरुड बु. भारज व वरुड बु जिप सर्कल च्या गावांमध्ये नागरीकांच्या भेटीगाठी दौऱ्यावर होते .

यावेळी ते म्हणाले की गेल्या अनेक वर्षांपासून या जिप सर्कल मधील नागरिकांशी माझे जिव्हाळ्याचे नाते संबंध



आहे तसेच प्रत्येकाच्या सुखा दुखात मी सहभागी असतो तर दोन वर्षा आधी मी माझ्या लग्नाला होणारा खर्चाला आळा देऊन मी त्या पैशात अनेक रुग्णांच्या अंजॉग्राफी साठी तो खर्च दिला तर दोन महिने आधी सोनगीरी डोळे तपासणीचे महा शिबिर घेऊन १७० रुग्णांची तपासणी करून शस्त्रक्रियेसाठी पात्र झालेल्या ३८ रुग्णांच्या डोळ्यांची मोफत शस्त्रक्रिया केली तसेच गावात स्वखर्चाने कच्चे रस्ते बनविले तसेच शालेय विद्यार्थी, महिला यांचे मनोबल वाढविण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करीत असून समाज व लोकउपयोगी अनेक उपक्रम मी या परिसरात राबविलेल असून तळागाळातील घटकापर्यंत माझ्या नात्यांची नाळ जुळलेली असून मी सर्वांना परीचित आहे तसेच शेतकरी, कामगार, कष्टकरी, वयस्क विद्यार्थी , तसेच महिला यांच्या न्याया हक्कासाठी मी लढत असून माझ्या परीने मी नागरिकांच्या अनेक समस्या सोडविलेल्या असल्याने लोकहित कामे करणे हेच ब्रीद माझ्या मनात असल्याने माझ्यावर या सर्कलमधील नागरिकांचा प्रचंड विश्वास असून वरूड बु या जिल्हा परिषद सर्कलची निवडणुक मी लढावी असे या परिसरातील शेतकरी, सर्वसामान्यांची इच्छा आहे .या जिल्हा परिषद सर्कलच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव कट्टीबद्ध असल्याने महाविकास आघाडीतील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी माझ्या कार्याची दखल घेऊन माझ्यावर या सर्कलची जिम्मेदारी द्यावी व मी या जिम्मेदारीचा पुरेपूर फायदा घेऊन वरिष्ठ तथा नागरिकांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही व प्रचंड बहुमताने निवडून येऊन वरुड बु या जिल्हा परिषद सर्कलचे विकासाच्या बाबतीत चेहरामोहरा बदलणार असल्याचेही पिंपळे म्हणाले .

## संगीताताई धोंडोपंत मानवतकर यांचे दुःखद निधन...



मंठा शहरातील शिव फुले शाहू आंबेडकर विचारवंत आणि साहित्यिक डॉ धोंडोपंत मानवतकर यांची पत्नी संगीताताई धोंडोपंत मानवतकर यांचे वयच्या ५५ व्या वर्षी ह्दयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. या दुःखद निधनाने मंठा शहर परिसरामध्ये हळहळ व्यक्त होत असून, त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, एक मुलगा, जावई असा परिवार आहे.

## आता उमेदवारांची लागणार कसोटी

### मंठा नगराध्यक्ष पदासाठी हालचालींना वेग

डॉ आशिष तिवारी/मंठा

मंठा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या आगामी निवडणुकीसाठीचा मोसम आता सुरू झाल्यानं शहरातील राजकीय वातावरण चांगलंच तापलंय.

आरक्षणाची घोषणा झाली असून, नगरपंचायतीचे नगराध्यक्ष पद हे इतर मागास प्रवर्गाकरिता राखीव झाले आहे. त्यामुळे संभाव्य उमेदवार, स्थानिक नेते व पक्षकारांमध्ये चढत्या चर्चा, बैठकी आणि तयारीचे सूर सुरू झाले आहेत.

येत्या निवडणुकीत थेट जनतेतून नगराध्यक्ष निवडला जाणार असल्याने प्रत्येक पक्षातील इच्छुक व्यक्तीला कसोशीची तयारी करावी लागणार आहे.

म्हणूनच या वेळी उमेदवारांची खरी 'कसोटी' लागणार, अशी चर्चा मंठा शहरात रंगली आहे.पक्षांतर्गत चर्चेला वेग

आगामी निवडणुकीसाठी तयारीसाठी मंठा शहरातील प्रमुख राजकीय पक्ष - शिवसेना, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी व काँग्रेस - या सर्व पक्षांमध्ये येणाऱ्या नगराध्यक्षपदाबाबत हालचाली सुरु झाल्या आहेत.

पक्षाच्या धोरणानुसार आणि आरक्षणाच्या मुद्यावर आगामी रणनीती ठरविण्यासाठी संबंधित पक्षांतील नेत्यांमध्ये गोपनीय बैठकांचे क्रम सुरु असल्याचे समोर येत आहे.

शहरात उमेदवारावर चर्चा

मंठा नगरपंचायत ची स्थापना झाल्यापासून बहुतेक वेळा नगराध्यक्षपदावर शिवसेना आणि भारतीय जनता पक्षातील उमेदवारांनाच संधी मिळली आहे.

मात्र, यावेळी आरक्षणानुसार आणि थेट जनतेसमोर येणाऱ्या निवडणुकीमुळे तरुण, कार्यकर्ता वर्गातही काही नव्या नावांची चर्चा सुरू झाली आहे.

विशेषत: सेवा करणारी व्यक्ती, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन आणि विकासाचा ठोस आराखिता या मुद्यावर जनतेच्या अपेक्षेनुसार काही नवीन चेहऱ्यांनाही संधी मिळण्याची शक्यता असल्याची चर्चा शहरात वेगाने पसरत आहे.

आरक्षणाच्या निर्णयाने निवडणूक रंगात

नागरपंचायतीतील नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर आता कोणत्या पक्षातून कोण? या प्रश्नावर सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे.प्रत्येक पक्षातील प्रमुख नेत्यांनाही उमेदवार निवडण्यासाठी जनमत गोळा करण्याची प्रक्रिया सुरू करावी लागेल.या प्रक्रियेत गतकाळातील कामगिरी, जनतेशी संवाद, आणि शहराच्या विकासाबाबतची दृष्टी या तिन्ही मुद्यांवर प्रत्येक उमेदवाराची परीक्षा होणार आहे.

नवीन आणि जुन्या नेतृत्वात संघर्षाची शक्यता

पूर्वी नगरपंचायत च्या निवडणुकीत प्रभाव टाकणारे काही अनुभवी नेते आता नव्या चेहऱ्यांमुळे आव्हानाला सामोरे येतील, अशी शंका ही व्यक्त होत आहे.

जनतेत प्रत्यक्ष काम केलेली, गत निवडणुकीत हजर राहिलेली आणि समस्यांवर उपाय सुचवणारी टीम - ही नव्या नगराध्यक्ष निवडीसाठीची मतदारांची अपेक्षाही अनेक नेत्यांना अटकेपलीकडची मेहनत करण्यास भाग पाडत आहे.

अध्यक्षपदाचा आरक्षण निकाल जाहीर झाल्यानंतर मंठा शहरातील आपली रणनीती या विषयावर विविध पक्षांतील नेत्यांची हालचाल सतत सुरू आहे.

लवकरच यासंबंधी शहरात कोणाचा दावा किती मजबूत? या विषयावर अनेक चर्चेची बात्या राजकारणात रंगण्याची शक्यता आहे.

## कुठल्याही परीक्षेला कमी समजू नका - नायब तहसीलदार अश्विनी पडोळे

### आजीवन विस्तार केंद्राचे उद्घाटन व बाबाजी कालेजमध्ये स्पर्धा परीक्षा विषयक मार्गदर्शन संपन्न

आष्टी - (प्रतिनिधी) जीवनात संकटे, प्रश्न, येणा-या अनेक अडचणी या अविभाज्य घटक आहेत परंतु या अडचणीवर मात करून जिद्द, मेहनत, चिकाटी, आत्मविश्वास आणि सातत्य या बाबीवर भर दिल्यास स्पर्धात्मक परीक्षेतील यश हमखास मिळतेच मिळते, मला हे जमेल का? अशी मानसीकता ठेवु नका. कुठल्याही छोट्या मोठ्या परीक्षेला कमी समजू नका असे प्रतिपादन आष्टीचे नायब तहसीलदार अश्विनी पडोळे यांनी आज येथे दिला.

आष्टी तालुक्यातील कडा येथे आनंदराव धोंडे महाविद्यालयातील युवा विद्यार्थ्यांसाठी संस्था आणि महाविद्यालय प्रशासनाच्या वतीने स्पर्धात्मक परीक्षेतील यश,समस्या आणि उपाय या विषयाच्या अनुषंगाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना नायब तहसीलदार अश्विनी पडोळे बोलत होत्या. व्यासपीठावर आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे आधीसभा सदस्य प्रोफेसर डॉ. हरिदास विधाते, नायब तहसिलदार भगीरथ धारक, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य संजय धोंडे, डा. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर महाराष्ट्र आजीवन शिक्षण विस्तार विभागाचे समन्वयक प्रा. डा. शाम सांगळे आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रस्ताविक प्रा. डा. शाम सांगळे यांनी केले. यावेळी प्राचार्य डा. हरिदास विधाते यांचे भाषण झाले. यावेळी नायब तहसिलदार श्रीमती पडोळे म्हणाल्या की, ग्रामीण भागातील शिक्षण क्षेत्रात अत्यंत मौलिक योगदान देणारे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्वावलंबनाची शिकवण आपल्या कार्यातून निर्माण करणारे आष्टी, पाटोदा, शिरूरचे माजी आ. भीमराव धोंडे यांचे वडील



कै. आनंदराव धोंडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मान्यवरांचे हस्ते कार्यक्रमाचे दीप प्रज्वल करण्यात आले.

यावेळी नायब तहसीलदार अश्विनी पडोळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पुढे म्हणाल्या की, भविष्यात तुम्हाला अनेक परीक्षांना सामोरे जावे लागेल या स्पर्धा परीक्षेची तयारी करताना मनामध्ये सकारात्मक भाव आणि आत्मविश्वास असू द्या.स्पर्धा परीक्षेची प्रचंड मेहनत करा. स्पर्धात्मक परीक्षा ही सोपी बाब नसली तरी ती अशक्य नाही असा विश्वास देत त्या म्हणाल्या, मी सुरुवातीला अभ्यास करताना अनेक समस्यांना सामोरे गेले परंतु मैत्रिणी तसेच माझे पती यांनी मला विश्वास आणि दिशा दिली त्यातून मार्ग सुकर बनला. जास्त अडचणीत माणूस जास्त पाय हलवतो आणि भक्कम बनतो असे सांगून त्यांनी कुठल्याही परीक्षेला कमी समजू नका. मन लावून अभ्यास करत त्यात जीव ओतून यशासाठी प्रयत्नशील राहा असा सल्ला दिला. यावेळी त्यांनी स्वतःचे अनेक अनुभव विद्यार्थ्यांना शेअर करत त्यांच्यामध्ये नवचैतन्य आणि आत्मविश्वास देण्याचा यशस्वी प्रयत्न केला.अध्यक्ष स्थानावरून बोलताना आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रोफेसर डॉ. हरिदास विधाते यांनीही विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. ग्रामीण विद्यार्थ्यात प्रचंड अभ्यासाची कुवत आणि क्षमता असते. त्यांनी या भागातील यशस्वी झालेल्या अधिकाऱ्यांची प्रेरणा घेतल्यास आणि महाविद्यालयातील ग्रंथांचा अभ्यासासाठी आधार घेतल्यास विविध परीक्षेसाठी तुम्ही नक्की यशस्वी व्हाल अशा शुभेच्छा दिल्या. बाबाजी धोंडे महाविद्यालयातील भव्य ग्रंथालयाचा आणि अनुभवी उच्चशिक्षित प्राध्यापक यांच्या ज्ञानाचा फायदा आपल्यासाठी सदैव असेल असे सांगितले. स्पर्धा परीक्षेच्या मार्गदर्शन कार्यक्रमासाठी आनंदराव धोंडे महाविद्यालयातील उपप्राचार्य, वरिष्ठ सहाय्यक प्राध्यापक इतर कर्मचारी आणि महाविद्यालयातील युवा वर्ग आणि युवती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. संचलन प्रोफेसर ढवळे यांनी तर आभार उपप्राचार्य संजय धोंडे यांनी मानले.

# परिवर्तनवादी विचाराची कास आणि विज्ञाननिष्ठ कार्यकर्तृत्व म्हणजे डॉ. पंजाबराव देशमुख

## कर्मयोगी नानासाहेब जाधव यांचे प्रतिपादन,वसंतराव नाईक महाविद्यालयात देशमुख जयंती व्याख्यानमाला

नवीन नांदेड - छत्रपती शिवाजी महाराज हे ज्यांचे आदर्श होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज यांच्या विचाराचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला. आपल्या जीवनाची वाटचाल त्यांनी याच महान विचारधारेने केली. एक समर्पित आणि पुरोगामी व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. पंजाबराव देशमुख कर्तेसुधारक होते, असे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते प्रा. डॉ. चत्रभुज कदम यांनी केले.

श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी, नांदेड आणि श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती संचलित आर.आर.लाहोटी विज्ञान महाविद्यालय मोर्शी जि. अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानमाला घेण्यात आली. 'डॉ.पंजाबराव उपाख्य: भाऊसाहेब देशमुख महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे पाईक' या प्रा. डॉ. चत्रभुज कदम प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव,संस्थेच्या उपाध्यक्षा सौ.शांतादेवी जाधव तर वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार, आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय, मोर्शी जि.अमरावती येथील प्राचार्य डॉ.जी. एन.चौधरी, व्याख्यानमालेचे संयोजक उपप्राचार्य डॉ.व्ही.आर. राठोड आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.एन.पी.दिंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात प्रा. डॉ. चत्रभुज कदम पुढे म्हणाले की, डॉ. पंजाबराव देशमुख यांना शिक्षणासाठी मोठा संघर्ष करावा लागला.आत्मविश्वासाच्या बळावर सामान्य परिस्थितीतूनही असामान्य कर्तृत्व गाजवता येते, यावर पंजाबराव देशमुख यांचा विश्वास होता. देवळांतील पैसा बहुजनांच्या कल्याणासाठी वापरला पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यांनी भारत कृषक समाजाची स्थापना केली. विदेशातील सुधारित बी- बियाणे, तंत्रज्ञान भारतात आणले. पंजाबरावांनी संपूर्ण जगभर फिरून नुसती मौज केली नाही तर विविध देशातून नव्या गोष्टींच्या शोधासाठी



संपूर्ण जगभर प्रवास केला,असेही प्रतिपादन डॉ. चत्रभुज कदम यांनी केले. व्याख्यानमालेचा अध्यक्षीय समारोप करताना कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा मांडला. परिवर्तनवादी विचार आणि शेतकरी कल्याणाचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून ध्यास घेणारे व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. पंजाबराव देशमुख होते असेही त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ.नागेश कांबळे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ.साहेबराव शिंदे यांनी केले तर प्राचार्य डॉ.जी.एन. चौधरी यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रोफेसर डॉ.रेणुका मोरे,डॉ.एस. व्ही.शेटे,डॉ.अनिल गच्चे,डॉ.डी. एस. पालीमकर, डॉ.आर.एम. कागणे,डॉ.व्यंकटेश देशमुख,डॉ. संजय गिरे,डॉ.उत्तम कानवटे,डॉ. साहेबराव मोरे, डॉ.गणेश लिंगमपल्ले, डॉ.विजयकुमार मोरे, डॉ. गणेश ईजळकर, डॉ. लालबा खरात

## वीज कर्मचाऱ्यांच्या संपाला नांदेड परिमंडळात संमिश्र प्रतिसाद; संपकाळातही वीज पुरवठा सुरळीत सुरु




नांदेड ।प्रतिनिधी

दि ९ ऑक्टोंबर रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीच्या ७२ तासांच्या संपाच्या नोटीसनुसार ९ ऑक्टोबर पासून संप सुरु आहे. संप काळात वीज ग्राहकांची गैरसोय होऊ नये म्हणून परिमंडल स्तरावरुन पर्याप्त उपाययोजना करण्यात आल्याने नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात सर्वत्र सुरळीत वीज पुरवठा सुरु ठेवला जात आहे. संपकाळात गुरुवारी दुपार पर्यंतच्या माहीतीनुसार ३१०० वीज कर्मचाऱ्यांपैकी सात कामगार संघटनांचे बी आणि जनरल शिफ्टमधील सुमारे ६५० वीज कर्मचारी संपावर होते. सरासरी २० टक्के कर्मचारी संपात सहभागी आहेत.

वीज ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी उपविभाग, विभाग, मंडल आणि परिमंडल स्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करुन तिथे तिन ही शिफ्टमध्ये अधिकारी- कर्मचाऱ्याची नेमणूका करण्यात आल्या आहेत. प्रत्येक नियंत्रण कक्षातून शाखा स्तरावरून वेळोवेळी अहवाल घेऊन योग्य त्या सुचना देण्यात आल्याने संपामुळे वीज पुरवठ्यावर कुठेही विपरित परिणाम झालेला नाही. मंडल आणि परिमंडलासह सर्व स्तरावरुन परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

सध्या अतिवृष्टी व पूर परिस्थिती आहे. त्यातून सावरण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा युध्दपातळीवर कार्यरत आहेत. दिवाळी सण तोंडावर आहे. या पार्श्वभूमीवर संपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांनी शासकीय कर्तव्य बजावण्यासाठी आपापल्या कार्यालयामध्ये विनाविलंब रुजू होण्याचे आवाहन वरिष्ठ व्यवस्थापनाने केले आहे.

वीज ही अत्यावश्यक सेवा आहे. विजेअभावी नागरिकांची गेरसोय होऊ नये यासाठी महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम अर्थात, मेस्मा लागू करण्यात आला आहे. त्यानुसार संप बेकायदेशीर असल्याचे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

संपकाळात सुरळीत वीज पुरवठ्यासाठी सर्व क्षेत्रीय विभाग कार्यालयांच्या निवडसूचीवर असलेल्या सर्व कंत्राटदारांना आवश्यक साधनसामग्री, मनुष्यबळ व वाहनांसह संबंधित कार्यालयांमध्ये उपलब्ध राहण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. सोबतच महावितरणकडून वितरण रोहीत्र, ऑईल, वीज तारा, केबल्स, वीजखांब, फिडरपिलर्स, वितरणपेठ्या, वाहतुकीसाठी वाहने आदी आवश्यक साधनसामग्री विविध कार्यालयामध्ये उपलब्ध ठेवण्यात आली आहे.

संपकाळात वीजसेवा देणाऱ्या कर्मचारी अधिकाऱ्यांना नागरिकांनी सहकार्य करावे. शिवाय, वीजपुरवठ्या संदर्भात काही तक्रार असल्यास नांदेड जिल्ह्यासाठी ७८७५४७३९८०, परभणीसाठी ७८७५४७६३२६ तर हिंगोली जिल्ह्यासाठी ७८७५४४७१४३ या क्रमांकावरुन डीएसएस कंट्रोल रुम शिवाय १९१२ किंवा १८००१०२३४३५ आणि १८००२३३३४३५ या टोलफ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात येत आहे.

## वृत्तपत्र वितरक विकास मंडळाचा २६ वा वर्धापन दिन व वृत्तपत्र विक्रेता दिना निमित्त १५ ऑक्टोंबर रोजी जिल्हा मेळावा

नांदेड - महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटना संलग्न नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाचा २६ वा वर्धापन दिन व वृत्तपत्र विक्रेता दिनाच्या निमित्ताने वृत्तपत्र विक्रेता जिल्हा मेळावा १५ ऑक्टोंबर बुधवार रोजी दुपारनंतर ४ वाजता शिवाजी नगर येथील विसावा हॉटेल मध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. यावर्षीचा सन्मानाचा मानला जाणारा कामगार नेते अनंतराव नागापूरकर यांच्या नावाने दिला जाणारा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जेष्ठ संपादक, पत्रकार श्री शंतनु डोईफोडे यांना तर वृत्तपत्र विक्रेता संघटक राज्यस्तरीय पुरस्कार शंकरराव गंगाधरराव संगेवार (मुखेड) यांना जाहीर करण्यात आला आहे. राज्यात सन्मानाचा पुरस्कार मानला जाणा-या अनंत नागापूरकर राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण या मेळाव्यात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तसेच दरवर्षी प्रमाणे यंदाही जेष्ठ वृत्तपत्र विक्रेत्यांचा सत्कार, गुणवंत पाल्याचा सत्कार तसेच विविध कार्यक्रमांसह वृत्तपत्र विक्रेत्याचे परिवारासह स्नेह गेट टुगेदर उत्साहात होणार आहे अशी माहिती राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार व जिल्हाध्यक्ष चंद्रकांत घाटोळ यांनी दिली आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील वृत्तपत्र विक्रेता बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा उपाध्यक्ष सतीश कदम,सचिव गणेश वडगांवकर, कोषाध्यक्ष बाबु जल्देवार,सल्लागार सरदारसिंह सुर्यवंशी (चौहान) भागवत गायकवाड, बालाजी चंदेल,गणेश जुजाराव ,संदिप कटकमवार ,दिपक नरवाडे , सत्यनारायण देवरकोंडा,दिपक तिडके ,बालाजी सुताडे,अनुप ठाकुर, विठ्ठल फडेवार ,अवधूत पसलवाड, विनायक आंधे, शंकर हुस्से,आदी यांनी केले आहे.

## मुदखेड नगर परिषदेच्या आरक्षणाची सोडत जाहीर

मुदखेड ।प्रतिनिधी

बहुप्रतीक्षेत असलेल्या मुदखेड नगर परिषदेच्या आरक्षणाची सोडत आठ ऑक्टोबर रोजी उपविभागीय अधिकारी प्रवीण मंगशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली नगरपालिकेच्या सभागृहात पार पडली यामध्ये अनुसूचित जाती अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागास प्रवर्ग यासाठी पहिल्यांदा आरक्षणाची घोषणा करण्यात आली आरक्षण प्रक्रिया चिठ्ठी जि प शाळेतील चार चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात आल्या यामध्ये सर्व प्रवर्गातील दहा महिलांसाठी ५० टक्के आरक्षण घोषित करण्यात आले आहे यावेळी शहरातील विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीं प्रामुख्याने उपस्थित होते आरक्षण सोडत प्रक्रियेनंतर नगरपरिषद निवडणुकीच्या प्रक्रियेला वेग आला असून इच्छुक उमेदवारांनी आपल्या पद्धतीने मोर्चे बांधणीला सुरुवात केल्याचे दिसून आले .

## नविन नांदेड भागातील शेकडो युवकांचा शिवसेना शिंदे गटात पक्ष प्रवेश



आगामी मनपा च्या निवडणूकी मध्ये परिवर्तन होणार,आ. बोंढारकर

नांदेड : - विधानसभा निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी केल्या नंतर नवीन नांदेड भागातील मनपा क्षेत्रातील असरजन, असदवन, वाघाळा,कौठा , वसरणी सह सिडको हडको भागातील अनेक भागात शिवसेना शिंदे गटाची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली असून अनेक शेकडो युवकांनी शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश दि ९ सप्टेंबर रोजी नांदेड दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून प्रमोद ढवळे यांच्या मार्गदर्शना खाली शेकडो युवकांचे पक्ष प्रवेश करूण घेऊन त्यांचा भव्य सत्कार सोहळा संपन्न झाला यावेळी आ. बोंढारकर बोलत होते.

९ सप्टेंबर रोजी शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या संपर्क कार्यालय येथे नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर,जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, युवासेना जिल्हा प्रमुख विठ्ठल मोरे, शहरप्रमुख सुहास पाटील खराणे,युवा सेना तालुका प्रमुख बालाजी सपुरे, माजी नगरसेवक राजेंद्र कुलथे, राजु टमान्ना,दता पाटील कदम,पप्पू गायकवाड,दशरथ कंधारे, कृष्णा पांचाळ,रवि थोरात, यांच्या उपस्थितीत शाहु नगर ,मिरा नगर,कंथक नगर, वाल्मिकी नगर ,वाघाळा ,असदवन भागातील शेकडो युवकांनी नांदेड दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून प्रमोद ढवळे यांच्या सह परिसरातील शेकडो युवकांनी नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्ष प्रवेश केला यावेळी उपस्थित युवकांना भगवी दस्ती टाकुन प्रवेश देण्यात आला यावेळी शिवसेना जिंदाबाद,विनय पाटील अगे बढो हाम तुम्हारे साथ आशा घोषणा देण्यात आल्या व ,ढोलताशांच्या गजरात फटाक्यांची आतिषबाजी करून पक्षप्रवेश स्वागत करण्यात आले.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यानंतर फटाक्यांची आतषबाजी मध्ये पक्ष प्रवेश स्वागत केले. आगामी मनपाच्या निवडणूक पार्श्वभूमीवर हा नवीन नांदेड भागातील मोठा पक्ष प्रवेश सोहळा ठरला. आगामी काळात सिडको हडकोतील विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगून मनपा निवडणुकीत महापौर शिवसेना गटाचे राहण्यासाठी प्रयत्न शिल राहणार असल्याचे मत जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे यांनी व्यक्त केले.




## राजीव गांधी महाविद्यालयातर्फे पूरग्रस्तांसाठी मदत फेरी

मुदखेड :- दि. ७ ऑक्टोबर रोजी श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी नांदेड संचलित राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पूरग्रस्तांसाठी मदत फेरीचे आयोजन करण्यात आले.या फेरीत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला. मुदखेड शहरातील मुख्य बाजारपेठेत स्वयंसेवकांनी जनतेकडून पूरबाधितांसाठी निधी संकलन केले. जमा झालेला निधी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत शासनाकडे सुपूर्द करून तो पूरग्रस्त शेतकरी व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होते, लोकांशी मिळून मिसळून काम करण्याची कौशल्ये विकसित होतात आणि समाजातील समस्यांवर उपाय शोधण्याची वृत्ती दृढ होते, असे प्राचार्य शिंदे यांनी सांगितले.या मदत फेरीत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रकाश कोथळे, इतिहास विभाग प्रमुख डॉ. आर. एस. कोंडेकर, तसेच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सोबत एकूण २५ स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला.महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या या सामाजिक उपक्रमाचे शहरवासीयांनी कौतुक केले, तसेच विद्यार्थ्यांच्या सामाजिक बांधिलकीचे हे प्रेरणादायी उदाहरण असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

## नांदेड शहर व जिल्ह्यातुन अवैध क्षमते पेक्षा जास्त वाहतूक करणाऱ्या वाहनवार कार्यवाही करा

शिवसेना शिंदे गटाचे दक्षिण जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे यांची मागणी

नांदेड :- नांदेड शहर व जिल्ह्यातुन अवैध क्षमते पेक्षा जास्त वाहतुक करणाऱ्या अवजड वाहनांवर त्वरीत कठोर कार्यवाही करुन अवैध अवजड वाहनांची वाहतुक बंद करावी अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे नांदेड दक्षिण जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी, परिवहन कार्यालय नांदेड यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

नांदेड शहर व जिल्ह्याच्या हद्दीतून मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांमधुन आर.टी.ओ. नियमांच्या ठरवून दिलेल्या क्षमतेपेक्षा जास्त माल सर्रासपणे वाहनात भरूण वाहतुक केली जात असून काही अवजड वाहने हे विना नंबर शहरातुन व जिल्ह्यामधुन अवैध वाहतुक करीत आहेत,अशा चालणाऱ्या वाहनामुळे जिल्ह्यात बरेचशे अपघात होऊन अनेक निष्पाप लोकांचा बळी जात आहे.सदरील अशा वाहनांना आपल्याच कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व आपल्या कार्यालयातील दलाल यांचे अभय आहे,अशा वाहनांना अभय देणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कठोर कार्यवाही करुन आशा वाहनांची वाहतुक शहर व जिल्ह्यातुन बंद करण्यात यावी.

अन्यथा येणाऱ्या काळात शिवसेनेच्या सटाईलने आपल्या कार्यालया समोर तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना शिंदे गटाचे नांदेड दक्षिण जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# शिव्यामुक्त समाजासाठी प्र- कुलगुरुंसह सर्व मान्यवरांनी घेतली शपथ

नांदेड : - संविधान ,मानवता व समानतेच्या सर्वोच्चमूल्यांसाठी मानवी प्रतिष्ठेने जगण्याच्या मूलभूत हक्कासाठी,लिंगाधारित समानतेसाठी,सभ्य व सुसंस्कृत समाजासाठी आणि आपल्या देशाच्या समृध्द संस्कृतीच्या रक्षणार्थ आया -बहिणींवरून दिल्या जाणाऱ्या, अश्लील व अवमानकारक शिव्यांचे समाजातून उच्चाटन होणे गरजेचे असल्यामुळे महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) तर्फे राज्यात शिव्यामुक्त समाज अभियान सुरू करण्यात आलेले आहे.

त्या अंतर्गत जवाहरलाल नेहरु समाज कार्य महाविद्यालय, नांदेड व महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स(मास्वे) च्या संयुक्त विद्यमाने शाश्वत विकासासाठी समाजकार्य हस्तक्षेप संधी व आव्हाने या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ नानासाहेब जाधव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र - कुलगुरु डॉ अशोक महाजन, मास्वे चे संस्थापक अध्यक्ष व शिव्यामुक्त समाज अभियान महाराष्ट्राचे संयोजक प्रा.अंबादास मोहिते, संस्थेच्या उपाध्यक्ष शांतादेवी जाधव, प्राचार्य डॉ.प्रकाश जाधव,प्राचार्य डॉ.पी.एम.शहापूरकर, प्राचार्य डॉ एन जी पाटील, प्राचार्य डॉक्टर प्रकाश जाधव प्राचार्य डॉक्टर संजय गवई, चर्चासत्राचे संयोजक डॉ अंबादास कर्डिले यांचेसह उपस्थित मान्यवरांना संविधानाच्या मूल्यांचा आदर व मूलभूत कर्तव्यांचे पालन करण्याची,कोणताही भेदभाव न करता सर्व व्यक्तींचा आदर करण्याची, सुसंस्कृत समाजासाठी आणि लिंगभाव समानतेसाठी प्रयत्नशील राहण्याची, माता-भगिनींचा व एकुणच स्त्रीत्वाचाअनादर करणार्या शिव्यांचा वापर न करण्याची व संविधानिक मार्गाने शिव्यामुक्त समाजाच्या निर्मितीसाठी प्रयत्नशील राहण्याची मास्वे चे महासचिव डॉ संजय फुलकर यांनी शपथदिली. प्र- कुलगुरू डॉ.महाजन यांनी शिव्यामुक्त अभियानाची मुक्त कंठाने प्रशंसा केली.

यावेळी महाविद्यालयाचे प्रा डॉ. मेघराज कपूर ,डॉ. एम. ए. मांजरमकर, डॉ. व्ही .एस .रेड्डी, प्रा सुनील राठोड डॉ.दिलीप काठोडे, प्रा. गोपाळ बडगिरे ,डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. शेख आसिफ ,डॉ.सत्वशीला वर्गघंटे, डॉ. प्रतिभा लोखंडे, प्रा.सुनील गोविंनवाड यांच्या सह अनेकांची उपस्थित होते